cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१० | रविवार दि.२९ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### नैतिकतेचा प्रश्न आणि राजकारणातील अध:पतन

राज्यात अशोक खरात यांच्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणाने आधीच समाजमन अस्वस्थ झालेले असताना, आता नरहरी झिरवाळ यांच्याशी संबंधित कथित व्हीडिओ प्रकरणामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील नैतिकतेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. सार्वजनिक जीवनात असलेल्या व्यक्तींच्या आचरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या या घटनांनी केवळ व्यक्तींचीच नव्हे, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेची प्रतिमा धुळीस मिळवण्याचे काम केले आहे.

# अतिवृष्टीमुळे दगावलेल्या सर्वच पशुधनासाठी सरसकट मदत

## जुन्या नियमांत केले बदल, राज्य सरकारचा मोठा निर्णय

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात जून ते सप्टेंबर दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीसोबतच पशुधनाचे मोठे नुकसान झाले आहे. या संकटामुळे अडचणीत आलेल्या पशुपालकांना मदत मिळावी यासाठी फडणवीस सरकारने मदतीचे नियम सुलभ करून निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, आता मृत पावलेल्या जनावरांच्या संख्येची जुनी मर्यादा पूर्णपणे काढून टाकण्यात आली असून, सर्व बाधित पशुपालकांना सरसकट आर्थिक मदत दिली जाणार आहे. यात आतापर्यंत मृत पावलेल्या जनावरांच्या मदतीसाठी जी कमीत–कमी मर्यादा निश्चित केली होती, ती अट आता रद्द केल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.**



मदतीच्या निकषात सरकारने हा बदल केला असून, याआधी फक्त अल्प, अत्यल्प भूधारक तसेच भूमिहीन पशुपालकांनाच या मदतीचा लाभ मिळत होता. मात्र, नव्या निर्णयानुसार ही अट पूर्णपणे काढून टाकण्यात आली असून, आता सर्वच अपघातग्रस्त पशुपालक या मदतीसाठी पात्र ठरणार आहेत. त्याचबरोबर, प्रत्येक पशुपालकाला याआधी कमाल ३ मोठ्या दुधाळ जनावरांसाठीच मदत दिली जात होती. मात्र आता मृत किंवा बेपत्ता झालेल्या सर्व दुधाळ जनावरांसाठी मदत दिली जाणार आहे. तसेच, ओढकाम करणाऱ्या जनावरांबाबतही ६ जनावरांची अट रद्द करून सर्व बाधित जनावरांना मदतीचा लाभ दिला जाणार आहे. दरम्यान, आर्थिक मदतीबाबत बोलायचे झाले तर, मृत मोठ्या दुधाळ जनावरासाठी प्रति जनावर ३७,५०० रुपये, तर ओढकाम करणाऱ्या मोठ्या जनावरांच्या मृत्यूसाठी ३२,००० रुपये दिले जाणार आहेत. तर लहान दुधाळ जनावरांच्या मृत्यूसाठी २०,००० रुपये, तर प्रति शेळी व मेंढीसाठी ४,००० रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. कुक्कुटपालन करणाऱ्यांसाठीही मोठा बदल करण्यात आला असून,

▶▶ पान २ वर

# युद्धस्थितीत सरकारकडून एलपीजी ऐवजी पीएनजीच्या वापरास प्रोत्साहन



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

अमेरिका– इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाला एक महिना पूर्ण झाला आहे. या युद्धाचा जागतिक ऊर्जा साधनांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. जगातील तेल साठे ज्या आखाती देशांमध्ये केंद्रीत झाले आहेत तिथं ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या मारा होत असल्यानं विध्वंस सुरु आहे. याचा परिणाम भारतासह इतर देशांवर होत असून सर्व देश ऊर्जा साधनांच्या संकटाचा सामना करत आहेत. रशियाने १ एप्रिलपासून पेट्रोलच्या निर्यातीला म्हणजेच विक्रीला बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वळभुमीवर भारत सरकारने पीएनजी कनेक्शन घेण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली आहे.

पीएनजी कनेक्शन ज्या ग्राहकांकडे आहे त्यांना एलपीजी सिलेंडर सरेंडर करण्यास सरकारने आवाहन केले आहे. जिथं पीएनजी लाईन पोहोचली आहे, त्या ठिकाणी ग्राहकांना पीएनजीचा वापर करण्यास सांगितले जात आहे. होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे सुरु नसल्याने एलपीजीच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. या स्थितीत सरकारकडून पीएनजीच्या वापराचे आवाहन केले जात आहे. भारतात पीएनजी पूर्व किनारपट्टीवरील कृष्णा

▶▶ पान २ वर

### महाराष्ट्रासाठी केंद्र सरकारने पाठबळ द्यावे – छगन भुजबळ

महाराष्ट्रात पाईपद्वारे नैसर्गिक वायू पुरवठा करणाऱ्या नेटवर्कचा विस्तार अधिक वेगाने करण्यासाठी केंद्र सरकारने तांत्रिक सहाय्य आणि पायाभूत सुविधांसाठी विशेष आर्थिक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केली. नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. ही बैठक केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर (शहरी विकास व गृहनिर्माण) आणि हरदीप सिंग पुरी (पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू) यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी, हरियाणा, दिल्ली आणि उत्तर प्रदेशचे नगरविकास व अन्न नागरी पुरवठा मंत्री, केंद्रीय सचिव तसेच महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर आणि विविध महानगरपालिकांचे आयुक्त व नैसर्गिक वायू कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते.

### पीएनजी म्हणजे काय ?

पीएनजी म्हणजे पाइप्ड नॅच्यूरल गॅस होय. या गॅसमध्ये अधिक प्रमाणात मिथेन वायू असतो, जो भूमिगत पाईपलाईनद्वारे थेट घरांपर्यंत पोहोचवला जातो. भारतात पीएनजी गॅसचा पुरवठा लिक्विफाईड नॅच्यूरल गॅसच्या रुपात केला जातो. तर, एलपीजी गॅस रिफायनरीत तयार केला जातो. ज्याची निर्मिती क्रूड ऑईलपासून केली जाते. पीएनजीचा पुरवठा नेहमी होत असतो, त्याच्या रिफिलिंगची आवश्यकता नसते.

## अंबाजोगाईत अत्याचार प्रकरणी डॉ.नीलम गोऱ्हे अक्रमक

मुंबई । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यात घडलेल्या २ वर्षे ५ महिने वयाच्या चिमुरडीवरील अत्याचार व मृत्यूची घटना अत्यंत संतापजनक असल्याचे सांगत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रशासनाला तातडीने कठोर कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत.**



प्राथमिक तपासात मृत्यू अपघाती असल्याचे सांगण्यात आले होते; मात्र शवविच्छेदन अहवालातून लैंगिक अत्याचार स्पष्ट झाल्याने प्रकरण गंभीर झाले असून, हा अहवाल महत्त्वाचा पुरावा ठरत आहे. पोलिसांनी अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले असून, गुन्ह्याची नोंद भारतीय न्याय संहिता २०२३ व बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्यानुसार करण्यात आली आहे. घटनेची गांभीर्याने दखल घेत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी बीडच्या पोलीस अधीक्षकांना निवेदनाद्वारे या प्रकरणाचा तपास जलदगती न्यायालयात चालवून आरोपीस कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. तसेच तपास पारदर्शक ठेवून सर्व वैद्यकीय व भौतिक पुरावे भक्कमपणे सादर करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. आरोपी अल्पवयीन असल्याने त्याच्यावर कायद्यानुसार बाल सुधारगृहात ठेवण्याची प्रक्रिया काटेकोरपणे

▶▶ पान २ वर

# ओळख असणे म्हणजे गुन्ह्यात सहभाग नव्हे

## अशोक खरात प्रकरणावर दीपक केसरकरांनी सोडले मौन

मुंबई । प्रतिनिधी

अशोक खरातच्या कृत्याबाबत मला कोणतीही माहिती नाही. माझा काहीही संबंध नसून या घटनेचा निषेध करतो. एखाद्याशी ओळख असणे म्हणजे कृत्यात सहभागी होणे असे होत नाही. मात्र, ठाकरेसेनेचे काही नेते राजकीय द्वेषापोटी माझा संबंध जोडण्याचा प्रयत्न करत आहेत, असे म्हणत शिंदेसेनेचे आमदार दीपक केसरकर यांनी ठाकरेसेनेवर निशाणा साधला.

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे



सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अशामध्ये, अशोक खरातसोबत शिवसेना नेते दीपक केसरकर यांचे काही फोटो व्हायरल झाले होते. यावर अखेर त्यांनी आपले मौन सोडले असून, पत्रकार परिषद घेत सर्व

▶▶ पान २ वर

## मंत्री नरहरी झिरवाळ यांचा आज राजीनामा?

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील महायुती सरकार मागील काही दिवसांपासून राष्ट्रवादीच्या मंत्र्यांमुळे अडचणीत येत असून, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या भोंदूबाबा अशोक खरातमुळे अडचणीत आलेला असतानाच पुन्हा दुसऱ्यांदा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्यामुळे पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि महायुती सरकार पुन्हा एकदा अडचणीत आले आहे. काही दिवसांपूर्वी नरहरी

▶▶ पान २ वर

# भारताच्या आणखी २ इंधनवाहक टँकर्सना इराणकडून परवानगी

तेहरान । वृत्तसेवा

अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील तणाव कायम असताना शनिवारी (दि. २८ मार्च) भारतासाठी मोठा दिलासा देणारे वृत्त समोर आले आहे. इराणने संघर्षाच्या काळात भारत आणि इतर चार ''मित्र राष्ट्रांना'' या जलमार्गातून आपली जहाजे नेण्याची परवानगी दिली जाईल, असे सांगितल्यानंतर भारताकडे जाणारे आणखी दोन एलपीजी टँकर्स संवेदनशील होर्मुझच्या सामुद्रधुनीतून गेले. शिपिंग



डेटानुसार, बीडब्ल्यू ईएलएम आणि बीडब्ल्यू टीवायआर टँकर्सनी युद्धाच्या सुरुवातीपासून प्रभावीपणे बंद असलेल्या या उच्च–जोखमीच्या कॉरिडॉरमधून प्रवास केला. ओमानच्या आखाताच्या दिशेने जात होते.

९०,००० टनांहून अधिक एलपीजी (स्वयंपाकाचा गॅस) घेऊन जाणारे हे दोन भारतीय ध्वज असलेले टँकर्स आखातातून

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### लॉकडाऊन लागणार नाही; ममताच्या टीकेला उत्तर

नवी दिल्लीः देशात पुन्हा एकदा लॉकडाऊन लागू केला जाणार असल्याच्या चर्चांनी गेल्या काही दिवसांपासून जोर धरला आहे. मात्र, केंद्र सरकारने या सर्व बातम्यांचे खंडन करत देशात लॉकडाऊन लावण्याचा कोणताही विचार नसल्याचे स्पष्ट केले आहे. पश्चिम आशियातील संघर्ष आणि जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पसरणाऱ्या या अफवांवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत बोलताना कोरोना काळातील परिस्थितीचा संदर्भ दिला होता, ज्याचा चुकीचा अर्थ लावून सोशल मीडियावर लॉकडाऊनच्या अफवा पसरवल्या गेल्या. त्यात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकार लॉकडाऊन लावण्याची तयारी करीत असल्याचे वक्तव्य करून आगीत तेल ओतले. त्यामुळे देशभर लॉकडाऊनच्या अफवांना ऊत आला. म्हणून सरकारला याबाबत पुढे येऊन देशात लॉकडाऊन लावण्याची कोणतीही योजना नसल्याचे स्पष्ट करावे लागले.

### रशिया १ एप्रिलपासून पेट्रोल निर्यात थांबविणार

मॉस्को : रशिया–युक्रेन युद्धाच्या चौथ्या वर्षी आणि मध्यपूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी देशांतर्गत इंधन पुरवठा सुरक्षित करण्यासाठी कठोर पाऊल उचलले आहे. रशियाने १ एप्रिल २०२६ पासून पेट्रोलच्या निर्यातीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. देशांतर्गत बाजारपेठेत किमती स्थिर ठेवणे आणि पुरवठा सुरळीत ठेवणे हे यामागचे मुख्य कारण असल्याचे रशियाने म्हटले आहे. रशियामध्ये लवकरच शेतीचा हंगाम सुरू होत आहे. या काळात ट्रॅक्टर आणि इतर यंत्रसामग्रीसाठी इंधनाची मागणी वाढते. ही मागणी पूर्ण करण्यासाठी निर्यातीवर मर्यादा आणणे आवश्यक असल्याचे रशियाने स्पष्ट केले आहे. युक्रेनने रशियाच्या अनेक तेल शुद्धीकरण प्रकल्पांवर ड्रोन हल्ले केल्यामुळे उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे रशियाला आपल्या नागरिकांसाठी पुरेसा साठा राखून ठेवावा लागत आहे.

### नेपाळचे माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना अटक

काठमांडूः नेपाळचे माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना अटक करण्यात आली आहे. बालेन शाह यांनी पंतप्रधान होताच मोठी कारवाई केली आहे. शाह यांनी सत्ता स्थापन करताच विरोधकांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. पंतप्रधान बालेन शाह यांनी कॅबिनेट बैठकीत माजी पंतप्रधान ओली आणि माजी गृहमंत्री रमेश लेखक यांना अटक करण्याचे आदेश दिले होते. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांच्या मृत्यूप्रकरणी अटक करण्यात आली आहे. दोघांना अटक झाल्याने नेपाळच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. माजी पंतप्रधान आणि माजी गृहमंत्र्यांना अटक केल्याने नेपाळचे राजकारण तापले आहे. बालेन शाह यांनी सत्तेत विराजमान होताच कठोर पावले उचलणार असल्याचे आधीच स्पष्ट केले होते. त्यानुसार कारवाईचा धडाका सुरू केला आहे. बालेन शाह सरकारने आंदोलनात झालेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यू प्रकरणात माजी पंतप्रधानांना अटक केली आहे. बालेन शाह यांनी कॅबिनेटची बैठक बोलावली होती. या बैठकीत तपासाचा अहवाल सादर करण्यात आला होता.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ मार्च २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १७६.०० क्विंटल | २,१३२ | २,६११ | २,२८८ |
| ज्वारी/हायब्रिड: ६६.०० क्विंटल | १,९३० | ४,५११ | ३,१६२ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.०० क्विंटल | ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ४१.०० क्विंटल | २,४०० | ३,०६० | २,६५७ |
| मुगः २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: ५,४०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| हरभरा: १५.०० क्विंटल | ४,९५१ | ५,०७१ | ५,०११ |

# राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार?

## राजलक्ष्मी भोसले, सना मलिक आणि सरोज अहिरे यांच्या नावांची चर्चा, सुनेत्रा पवार कोणाला संधी देणार

पुणे । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये महिला प्रदेशाध्यक्ष पदासाठी नव्या चेहऱ्याच्या शोधाला वेग आला आहे. रुपाली चाकणकर यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर या महत्त्वाच्या पदावर कोणाची वर्णी लागणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्यासमोर आता सक्षम आणि संघटनक्षम नेतृत्व निवडण्याचे मोठे आव्हान आहे.**


राजलक्ष्मी भोसले


सरोज अहिरे


सना मलिक

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणामुळे चाकणकर अडचणीत आल्या होत्या. त्यानंतर त्यांनी प्रथम राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि त्यानंतर महिला प्रदेशाध्यक्ष पदावरूनही पायउतार झाल्या. त्यामुळे या पदासाठी नव्या नेतृत्वाची गरज निर्माण झाली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या पदासाठी सध्या अनेक महिला नेत्यांची नावे चर्चेत आहेत. त्यात सना मलिक यांचे नाव आघाडीवर मानले जात आहे. त्या आमदार असून माजी मंत्री नवाब मलिक यांच्या कन्या आहेत. अल्पसंख्याक समाजाचे प्रतिनिधित्व करणारा चेहरा म्हणून त्यांना प्राधान्य मिळू शकते. मात्र त्यांच्या निवडीला विरोधकांकडून राजकीय विरोध होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय सरोज अहिरे यांचेही नाव चर्चेत आहे. देवळालीच्या आमदार असलेल्या अहिरे यांचा उत्तर महाराष्ट्रात प्रभाव आहे. मात्र, पक्षातील मोठ्या जबाबदाऱ्या आणि संघटन कौशल्याबाबत काही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. वैशाली नागवडे यांना देखील अनुभवी आणि अभ्यासू नेत्या म्हणून पाहिले जाते. महानंदा संघटनेच्या अध्यक्षपदाचा त्यांना अनुभव आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत त्या सक्रिय राजकारणात काहीशा मागे पडल्याची चर्चा आहे, जी त्यांच्या निवडीसमोर अडथळा ठरू शकते. पुण्याच्या राजकारणात

▶▶ पान २ वर

## काँग्रेसची उद्यापासून सुरतगाव ते तुळजापूर 'शेतकरी संघर्ष न्याय यात्रा'

धाराशिव । प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांच्या हक्कासाठी 'शेतकरी संघर्ष न्याय यात्रा' आयोजित केली असून, सोमवारी ३० मार्च रोजी धाराशीव जिल्ह्यातील सुरतगाव ते तुळजापूर अशी पदयात्रा निघणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या या संघर्ष यात्रेत पक्षाचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी व शेतकरी सहभागी होणार आहेत. पदयात्रेची सुरुवात सोलापूर – तुळजापूर महामार्गावरील सुरतगाव येथून सकाळी ८ वाजता होणार असून, संध्याकाळी ५ वाजता तुळजापूर येथील शारदा मंगल कार्यालयात सभेने या यात्रेचा समारोप होणार आहे. भाजपा सरकारच्या उद्योगपतीधार्जिण्या धोरणांमुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे. शेतकऱ्यांच्या



▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# नैतिकतेचा प्रश्न आणि राजकारणातील अध:पतन

राज्यात अशोक खरात यांच्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणाने आधीच समाजमन अस्वस्थ झालेले असताना, आता नरहरी झिरवाळ यांच्याशी संबंधित कथित व्हीडिओ प्रकरणामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील नैतिकतेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. सार्वजनिक जीवनात असलेल्या व्यक्तींच्या आचरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या या घटनांनी केवळ व्यक्तींचीच नव्हे, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेची प्रतिमा धुळीस मिळवण्याचे काम केले आहे.

या प्रकरणात सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सत्यता. संबंधित व्हीडिओची अधिकृत पुष्टी झालेली नसताना त्यावरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. आजच्या डिजिटल युगात कोणतीही दृश्य सामग्री सहजपणे एडिट, मॉर्फ किंवा संदर्भाबाहेर नेऊन व्हायरल करता येते. त्यामुळे अशा कोणत्याही प्रकरणात निष्कर्षापर्यंत पोहोचण्याआधी सखोल आणि निष्पक्ष चौकशी होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, व्यक्तीची प्रतिमा कायमची मलिन होऊ शकते, जरी नंतर आरोप खोटे ठरले तरी.

मात्र, या प्रकरणाने काही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. शासकीय निवासस्थानासारख्या अधिकृत ठिकाणी घडल्याचा दावा केला जात असलेला प्रकार, त्यात दिसणारे मद्य व इतर बाबी हे सर्व जर खरे ठरले, तर ते केवळ वैयक्तिक आयुष्याचा मुद्दा राहत नाही, तर सार्वजनिक पदाच्या जबाबदारीशी निगडित ठरते. सार्वजनिक पदावरील व्यक्तींनी केवळ कायद्याचे पालन करणे पुरेसे नसते, तर नैतिकतेचेही भान ठेवणे अपेक्षित असते. दुसरीकडे, हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार यांसारख्या विरोधी पक्षांच्या नेत्यांनी या प्रकरणावरून सरकारला लक्ष्य केले आहे, तर रोहित पवार यांनी संयमाची भूमिका मांडत, संबंधित व्यक्ती सज्ञान असल्यास राजकारण टाळावे असे मत व्यक्त केले आहे. या विरोधाभासी प्रतिक्रियांमधून स्पष्ट होते की, आजच्या राजकारणात नैतिकतेपेक्षा राजकीय फायद्याला अधिक प्राधान्य दिले जात आहे.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपस्थित केलेले मुद्देही दुर्लक्षित करता येणार नाहीत. ब्लॅकमेलिंगचा संशय, अनेक नेत्यांशी संबंधित असलेल्या व्यक्तींची भूमिका, आणि या सर्वामागील संभाव्य 'जाळे' हे सर्व तपासाच्या कक्षेत येणे गरजेचे आहे. जर खरोखरच कोणते 'रॅकेट' कार्यरत असेल, तर ते उघड करणे ही केवळ राजकीय नव्हे, तर सामाजिक जबाबदारी ठरते.

या प्रकरणात आणखी एक गंभीर बाजू म्हणजे तृतीयपंथी व्यक्तींचा उल्लेख ज्या पद्धतीने केला जात आहे, तो. समाजातील या घटकाला आधीच अनेक पूर्वग्रह आणि भेदभावांना सामोरे जावे लागते. अशा प्रकरणांमध्ये त्यांचा वापर 'सेंसेशनल' पद्धतीने केल्यास त्यांच्या सन्मानावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे या मुद्द्याकडेही संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे.

अमोल मिटकरी यांनी व्यक्त केलेला 'षडयंत्र'ाचा मुद्दाही तितकाच महत्त्वाचा आहे. राजकीय स्पर्धा, सत्तेची चढाओढ आणि अंतर्गत गटबाजी यामुळे अनेकदा अशा प्रकारचे 'कॅरेक्टर असॅसिनेशन'चे प्रकार घडत असल्याचे पूर्वीही दिसून आले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाचा तपास केवळ नैतिकतेच्या चौकटीत न राहता, राजकीय पार्श्वभूमी लक्षात घेऊन करणे आवश्यक आहे.

एकंदरीत, हे प्रकरण केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नाही. हे महाराष्ट्राच्या राजकारणातील वाढत्या नैतिक अध:पतनाचे लक्षण आहे. भ्रष्टाचार, लैंगिक शोषण, सत्तेचा गैरवापर आणि ब्लॅकमेलिंग या सगळ्या घटकांचा संगम होत असल्याचे चित्र समोर येत आहे. अशा परिस्थितीत केवळ राजीनाम्याच्या मागण्या करून प्रश्न सुटणार नाही. गरज आहे ती पारदर्शक, निष्पक्ष आणि वेगवान चौकशीची. राजकारण हे केवळ सत्तेचे साधन नसून, समाजासाठी आदर्श निर्माण करण्याचे माध्यम आहे. जर सत्ताधारीच नैतिकतेचे उल्लंघन करत असतील, तर समाजाकडून प्रामाणिकतेची अपेक्षा कशी ठेवणार? त्यामुळे या प्रकरणातून राजकीय व्यवस्थेने आत्मपरीक्षण करण्याची हीच योग्य वेळ आहे. अन्यथा, जनतेचा विश्वास उडण्याची प्रक्रिया अधिक वेगाने सुरू राहील आणि ती कोणत्याही लोकशाहीसाठी धोकादायक ठरेल.

# राम जन्मोत्सव मिरवणुकीत पोलीस.नि. बल्लाळ यांनी दिल्या 'सियावर रामचंद्र की जय' च्या घोषणा

## खालापुरीच्या नामदेव लोंढे यांनी केली ऑनलाईन तक्रार

बीड । प्रतिनिधी

**बीड शहरामध्ये रामनवमीच्या निमित्ताने निघालेल्या शोभा यात्रेत पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ हे गणवेशात असतांना त्यांनी 'सियावर रामचंद्र की जय' अशा घोषणा दिल्या. वास्तविक या घोषणा पोलीस पोशाखात असलेल्या पोलीस निरीक्षकांनी देणे हे कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे या प्रकरणात शिरूर तालुक्यातील खालापूरी येथील नामदेव दगडू लोंढे यांनी पोलीस निरीक्षक बल्लाळ यांच्याविरुद्ध ऑनलाईन तक्रार केलेली आहे.**

या तक्रारीत नामदेव लोंढे यांनी म्हटले आहे की दिनांक २६ मार्च रोजी सायंकाळी आठ वाजता मी खालापुरीत माझ्या घरी असताना सोशल मीडियाच्या माध्यमातून आलेले संदेश पाहत होतो. यामध्ये बीड शहरात रामनवमीच्या निमित्ताने शोभायात्रा निघाली होती. या शोभा यात्रेत काही उत्साही लोक घोषणा देत होते. यावेळी पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी ईतरांच्या घोषणा थांबवून स्वतःच सियावर रामचंद्र की जय अशा घोषणा दिल्या. ज्या नियमबाह्य आहेत. कायद्याने निषेधार्ह आहेत. याचे भान बल्लाळ यांनी ठेवणे गरजेचे होते. कर्तव्यावर असताना शिस्तभंग विषयक गैरवर्तन करून भारतीय संविधान १९५० आणि सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनानुसार आदेशाचे उल्लंघन करण्यात आले आहे. पोलीस अधिनियमाचे उल्लंघन झाल्याने या संदर्भात पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांच्यावर पोलीस दल हक्क प्रतिबंध अधिनियम १९६६चे कलम १३५, १३७, १४५, (२) (क)महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ नुसार गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी नामदेव लोंढे यांनी दिलेल्या तक्रारीत केली आहे.

# सर्वसामान्य नागरिकासह शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरातून न्याय मिळाला

अंबड । प्रतिनिधी

**अंबड तालुक्यातील मौजे वडीगोद्री येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराज स्व समाधान शिबिर टप्पा एक चा कार्यक्रम घेण्यात आला. सदर शिबिरासाठी घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे आ. हिकमत दादा उढाण यांची या छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरास उपस्थिती होती. या समाधान शिबिरामधून सर्वसामान्य नागरिकासह शेतकऱ्यांना न्याय मिळाला.**

या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे शासनाचे सर्व विभाग एकाच ठिकाणी उपलब्ध होते. महसूल विभाग ग्राम विकास विभाग कृषी विभाग आरोग्य विभाग महिला व बालविकास विभाग, महा-ई-सेवा केंद्र, महसूल विभागाअंतर्गत निवडणूक विभाग पुरवठा विभाग संजय गांधी योजना विभाग असे शासनाचे विविध विभाग या ठिकाणी होते. नागरिकांच्या वेगवेगळ्या प्रश्नांची सोडवणूक या शिबिराच्या माध्यमातून एकाच ठिकाणी अधिकाऱ्यांच्या समक्ष करण्यात आली. घराचा मोठा फायदा वडीगोद्री मंडळातील १४ गावच्या नागरिकांना झाला त्याबद्दल नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानले. या शिबिरासाठी उपविभागीय



अधिकारी उमाकांत पारधी, तहसीलदार विजय चव्हाण येणे दोन दिवसापासून तयारी सुरू केली होती आज सकाळपासून नागरिकांचे प्रश्न संपेपर्यंत हजर होते. यादरम्यान या दोन्ही अधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त नागरिकांना वेळ देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांची सोडवणूक या शिबिरामध्येच करून घेतली त्यामुळे नागरिकांमधून मोठ्या प्रमाणात समाधान व्यक्त करण्यात आले. मंडळ अधिकारी संदीप नरुटे यांनी मागील वर्षभरामध्ये वडीगोद्री मंडळामध्ये सर्वसामान्य जनतेमध्ये मिसळून मोठ्या प्रमाणामध्ये जनहिताचे काम केले आहे. खास करून शेतकऱ्यांच्या रस्त्याबाबत स्थळ पाहणी वेळीच दोन्ही शेतकऱ्यांना समजावून सांगून शेतकऱ्यांमध्ये समझोता करून मोठ्या प्रमाणावर रस्त्याचे प्रश्न जागेवरच निकाली काढले त्यामुळे शेतकऱ्यांना जाग्यावर न्याय मिळाल्याने त्यांना तहसील कार्यालय किंवा त्यावरील कार्यालयाच्या चकरा मारण्याची व आर्थिक नुकसान सोसण्याची गरज राहिली नाही. या कामामुळे वडीगोद्री मंडळातील शेतकरी यांनी मंडळ अधिकारी संदीप नरुटे यांचा सत्कार केला. तसेच वरिष्ठ अधिकारी यांनी सुद्धा त्यांचे या कामाबद्दल कौतुक केले. घरकुल लाभार्थ्यांना एक कोटी १५ लाखाचा हप्ता वितरण: मौजे दुनगाव येथील १९९ घरकुल लाभार्थ्यांना एक कोटी १५ लाख रुपयांचा दुसरा हप्ता या शिबिराच्या माध्यमातून वितरित करण्यात आला अशी माहिती दुन गावचे ग्राम पंचायत अधिकारी मिसाळ यांनी दिली. हे एक या शिबिराचे मोठे यश म्हणावे लागेल. कृषी विभागामार्फत राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत सात लाभार्थ्यांना ट्रॅक्टरचे वितरण तर दोन लाभार्थ्यांना पावर विडर तर एका लाभार्थ्याला सी एच सी चे वितरण करण्यात आले. मोफत पाच ब्रास वाळू वितरण पत्र वाटप या शिबिरामध्ये वडीगोद्री मंडळातील एकूण १६५ घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत वाळू वितरणाचे पत्र उपविभागीय अधिकारी अंबड व मा तहसीलदार अंबड यांच्याकडून यावेळी देण्यात आले. महिला सक्षमीकरण महिला सक्षमीकरणासाठी या शिबिरामध्ये महिला व बालविकास विभागामार्फत लाडकी बहीण योजनेचा स्टॉल लावण्यात आला होता ज्या ठिकाणी सर्वात जास्त गर्दी दिसून आली. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचे अनेक प्रश्नांची सोडवून यावेळेस करण्यात आली तसेच त्यांची केवायसी सुद्धा करण्यात आली. लाडकी बहीण योजनेचे अडकलेले हप्ते लाभार्थी महिलांना मिळतील याची खात्री मिळाली. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी मा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर ,जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी व तहसीलदार विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वडीगोद्री मंडळातील मंडळ अधिकारी व सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणात मेहनत घेतली व हे शिबिर अत्यंत यशस्वी केले. तसेच त्यांना स्थानिक नागरिक गणेश खटके बाळासाहेब गावडे रवींद्र खोमणे सुनील हंगारगे रोहित पवार यांनी मोलाचे सहकार्य केले. शिबिराचे उत्कृष्ट सूत्रसंचलन मंडळ अधिकारी संदीप नरुटे यांनी केले.

# पाच दिवसांमध्ये कोणतेही वेळी राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता

जालना । प्रतिनिधी

**३० मार्चपासून राज्यात ढगाळी हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ३० मार्च रोजी प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो.**

३० मार्चच्या तुलनेत ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो. त्यानंतर १ ते ४ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे, असेही आवाहन करण्यात येत आहे.

# हिंदुत्व आणि विकासाचा समतोल साधणारे नेतृत्व म्हणजे एकनाथ शिंदे-अनिल जगताप

बीड । प्रतिनिधी

**हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाच्या रक्षणासाठी भगवा झेंडा हाती घेऊन उभारलेली शिवसेना आजही त्याच विचारांनी पुढे जात आहे. या विचारांना जपत महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब कार्य करत असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले.**



माजलगाव तालुक्यातील शहाजानपूर येथे काल दि. २७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता शिवसेनेच्या नव्या शाखेचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास अनिलदादा जगताप प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात सर्वसामान्य जनतेच्या अडचणी सोडवून न्याय दिला. लाडकी बहीण योजना, शेतकरी योजना, विद्यार्थी योजना यांसारख्या लोकहितकारी योजनांमुळे त्यांनी जनतेच्या मनात लाडके मुख्यमंत्री म्हणून स्थान निर्माण केले. आम्ही गेली ४० वर्षे श्रध्येय बाळासाहेबांचे विचार जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम करत आहोत. शहाजानपूर गावातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि गोरगरिबांच्या सेवेसाठी ही शाखा स्थापन करण्यात आली असून पुढेही आम्ही सातत्याने काम करत राहू, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम बापू येवले यांनी केले. शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाच्या जिल्हा समन्वयक उज्वलाताई भोपळे आणि युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे यांनी आपल्या भाषणातून पक्षाची कार्यपद्धती व ध्येयधोरणे स्पष्ट केली. कार्यक्रमात शहाजानपूर शाखेच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. शाखाप्रमुख नवनाथ घाटूळ, उपशाखाप्रमुख गणेश जोगदंड, सचिव सूर्यभान बादाडे, सहसचिव नारायण बादाडे, कोषाध्यक्ष गजानन बादाडे तसेच सदस्यांचा सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. दरम्यान, प्रहार संघटनेचे युवक तालुकाध्यक्ष हरीश जाधव यांनी शिवसेनेत प्रवेश केला. याप्रसंगी शिवसेना बीड विधानसभा प्रमुख सुनील भाऊ अनभुले, युवासेना जिल्हाप्रमुख गणेश शिराळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख नितीन मुंदडा, युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या तालुका समन्वयक वैशालीताई आगे, आकाश भैय्या जगताप, प्रतिक कांबळे, धोंडीरामजी जाधव, अॅड.धर्मेंद्र भोपळे, सचिन कराळे, पत्रकार धनंजय माने, रामभाऊ आगे, सरपंच रामचंद्र डोईजड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक डोळे यांनी केले.

# जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक २६ मार्च २०२६ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. ९ एप्रिल २०२६ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपणास्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## पान १ वरून...

### अतिवृष्टीमुळे दगावलेल्या सर्वच

पूर्वीच्या १०० पक्षांच्या मर्यादेऐवजी आता मृत व बेपत्ता असलेल्या सर्व पक्षांसाठी प्रति नगामागे १०० रुपये दिले जातील. याव्यतिरिक्त, ज्या पशुपालकांचे गोठे पडले आहेत किंवा नष्ट झाले आहेत, त्यांनाही ३,००० रुपयांची मदत देऊन शासनाने मदतीचा हात दिला आहे.

------------

### अंबाजोगाईत अत्याचार प्रकरणी

राबवावी, असे त्यांनी नमूद केले. पीडित कुटुंबाला समुपदेशन व सुरक्षा देण्याबरोबरच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी बालसुरक्षा व जनजागृती मोहिमा राबविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

----------

### युद्धस्थितीत सरकारकडून एलपीजी

गोदावरी खोऱ्यात, आसाम आणि त्रिपुरामधून मिळतो. कृष्णा गोदावरी खोऱ्यात तीन क्षेत्र आहेत, आर क्लस्टर, सॅटेलाईट क्लस्टर आणि एमजे हे तीन भाग आहे. आसाम आणि त्रिपुरामधून पीएनजीची निर्मिती ४७ टक्के होते. याशिवाय भारत एलएनजीची आयात कतार, अमेरिका आणि ऑस्ट्रेलियातून केली जाते. भारतात १६.२ दशलक्ष घरगुती पीएनजी गॅस कनेक्शन आहेत. दुसरीकडे एलपीजी ग्राहकांची संख्या ३३२ दशलक्ष इतकी आहे.

----------

### भारताच्या आणखी २ इंधनवाहक

बाहेर पडताना एकमेकांच्या जवळून गेले आणि त्यांनी सुमारे २७ किमी/तास वेग कायम ठेवला. प्रामुख्याने कच्चे तेल घेऊन जाणारे आणखी सुमारे पाच भारतीय टँकर्स अजूनही संयुक्त अरब अमिरातीजवळील पाण्यात नांगरून आहेत आणि या सामुद्रधुनीतून जाण्यासाठी परवानगीची वाट पाहत आहेत. एकूण २० भारतीय ध्वज असलेली जहाजे आखातात अडकली आहेत. याशिवाय, या प्रदेशात अडकलेल्या आपल्या रिकाम्या जहाजांमध्ये भारत एलपीजी भरत आहे. जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल वाहतुकीच्या अडथळ्यांपैकी एक असलेल्या होर्मुझबाबत इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी तेहरानची भूमिका स्पष्ट केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही घडामोड समोर आली आहे. अराघची यांनी सरकारी टीव्हीला सांगितले की, चीन, रशिया, भारत, इराक आणि पाकिस्तान या पाच मित्र राष्ट्रांच्या टँकर्सना सुरक्षित मार्ग दिला जाईल. त्याच वेळी, त्यांनी असा इशाराही दिला की इराणच्या शत्रूंशी संबंधित जहाजांना नाकेबंदीचा सामना करावा लागेल. एक महिन्यापूर्वी युद्ध सुरू झाल्यापासून, जग वसंत, पाइन गॅस, शिवालिक आणि नंदा देवी या किमान चार भारतीय ध्वज असलेल्या जहाजांनी या सामुद्रधुनीतून प्रवास केला आहे. जहाजाच्या मार्गाच्या माहितीवरून असे दिसून आले की, ९०,००० टनांहून अधिक एलपीजी घेऊन जाणाऱ्या जग वसंत आणि पाइन गॅस या जहाजांनी अरबी समुद्रातून जाणारा लहान मार्ग घेण्याऐवजी एक असामान्य मार्ग निवडला आणि इराणच्या लारक व केशम बेटांमधून होर्मुझ महासागर ओलांडला.

----------

### मंत्री नरहरी झिरवाळ

झिरवाळ यांच्या मंत्रालयातील केबिनमधून त्यांच्याकडे क्लार्कला लाच स्विकारताना अटक करण्यात आली. त्यावेळी नरहरी झिरवाळ यांना अध्यात ना मध्यात असतात म्हणून मंत्री पदाचे जीवदान देण्यात आले. त्यास काही दिवसांचा अवधी लोटत नाही तोच नरहरी झिरवाळ यांचा एका तृतीयपंथीय व्यक्तीसोबतचा बेडरूममधील एका व्हिडिओ व्हायरल झाला. विशेष म्हणजे अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सदरचा व्हिडिओ व्हायरल झाला. त्यामुळे व्हिडिओचे पडसाद विधिमंडळात उमटले नाहीत. पण राष्ट्रवादी पक्षाच्या स्तरावर आणि सरकार पातळीवर उमटले आहेत. त्यातच या प्रकरणावरून विरोधकांकडूनही नरहरी झिरवळ यांच्या राजीनाम्यासाठी सरकारवर दबाव आणण्यात येत आहे.

------------

### ओळख असणे म्हणजे

आरोपांवर खुलासा केला आहे. दीपक केसरकर म्हणाले, अशोक खरात प्रकरणी सध्या महाराष्ट्रात विविध प्रकरण समोर येत आहेत. त्याच्या मंदिराला भेट दिल्यानंतर त्यांच्यासोबत असलेल्या फोटोंबाबतीत वेगवेगळे जे फुलले जात आहे, त्यावर खुलासा करणे हे माझे कर्तव्य आहे. मी स्वतः एक शिवभक्त, एक साईभक्त आहे. वयाच्या पंधराव्या वर्षांपासून शिवमंदिरात जातो. त्याचवेळी माझी आणि अशोक खरातची भेट झाली होती. त्याचेच फोटो व्हायरल झाले. शंकराच्या पिंडाची पूजा करत असताना अशोक खरातसोबत मी आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिसत आहेत. तिसरा फोटो अशोक खरातच्या को-ऑपरेटिव्ह संस्थेचे पाहुणे म्हणून मला बोलवले होते तिकडचा फोटो आहे. त्यावेळी अशोक खरात उपस्थित होता. त्यामध्ये, रूपाली चाकणकरदेखील होत्या, असे स्पष्टीकरण त्यांनी यावेळी दिले.

------------

### काँग्रेसची उद्यापासून सुरतगाव ते तुळजापूर

शेतमालाला भाव मिळत नाही. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या भाजपा सरकारच्या वल्गना हवेतच विरल्या आहेत. भाजपा सरकार एमएसपीचा कायदाही करत नाही. हमीभावापेक्षा कमी भाव देणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या घोषणाही भाजपा सरकारने केल्या पण त्याही कागदावरच राहिल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे, तर मोदी सरकारने अमेरिकेबरोबर व्यापारी करार करून शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे. या करारामुळे भारतातील शेती व शेतकरी उद्ध्वस्थ होणार आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी काँग्रेस संसद, विधिमंडळ व रस्त्यावरही लढत असून, या संघर्ष यात्रेत शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने केले आहे.

------------

### राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी

सक्रिय असलेल्या राजलक्ष्मी भोसले यांचे नावही जोरात आहे. त्या पुणे महापालिकेच्या माजी महापौर असून, सध्या पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष आहेत. अलीकडील निवडणुकांमध्ये त्यांचा 'स्टार प्रचारक' म्हणून समावेश होता. संघटन कौशल्य आणि स्थानिक पातळीवरील मजबूत पकड ही त्यांची जमेची बाजू मानली जाते. दरम्यान, महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, तसेच इतर काही महिला नेत्यांचीही नावे चर्चेत आहेत. मात्र अंतिम निर्णय सुनेत्रा पवार आणि पक्ष नेतृत्वाकडूनच घेतला जाणार आहे. एकूणच, राष्ट्रवादी काँग्रेससाठी महिला प्रदेशाध्यक्ष पदाची निवड ही केवळ संघटनात्मक बदल नसून आगामी राजकीय रणनीतीचा महत्त्वाचा भाग ठरणार आहे. योग्य नेतृत्वाची निवड पक्षाच्या भविष्यासाठी निर्णायक ठरणार असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

# भारताची जनगणना २०२७ अंतर्गत घर यादी कार्यक्रमासाठी तीन दिवसीय प्रशिक्षण संपत्र

बीड । प्रतिनिधी

**भारताची जनगणना २०२७ अंतर्गत घर यादी (कीशश्रळीींळपस रपव र्हीी-ळपस उशपर) कार्यक्रम हा प्रभावी अंमलबजावणीसाठी तहसीलदार व मुख्याधिकारी यांच्यासाठी द्वितीय टप्प्यातील तीन दिवसीय प्रशिक्षण सत्र दि. २३मार्च २०२६ ते २५ मार्च २०२६ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहात यशस्वीरीत्या पार पडले.**

या प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना त्यांनी नमूद केले की, निवडणुकांप्रमाणेच जनगणना ही देशाच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून या माध्यमातून सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक घटकांचे अचूक मूल्यमापन केले जाते त्यामुळे ही प्रक्रिया वेळेत अचूक व नियोजनबद्ध पद्धतीने राबविणे आवश्यक आहे. घर यादी कार्यक्रम राबविताना प्रत्येक घर व प्रत्येक कुटुंबाची संपूर्ण व अचूक नोंद होईल याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले तसेच प्रगणकांनी नागरिकांशी सकारात्मक व समंजस संवाद साधून माहिती संकलनात लोकांचा सक्रिय सहभाग वाढवावा असेही त्यांनी सांगितले दहा वर्षांतून एकदा होणारी जनगणना ही देशाच्या विकासाचा भक्कम पाया ठरणारी प्रक्रिया असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी सज्ज राहून जबाबदारीने कार्य करावे, असे आवाहन करण्यात आले यावेळी सर्व तहसीलदार जिल्हा बीड तसेच नगरपरिषद व नगरपंचायत मुख्याधिकारी यांनी समन्वयाने कार्य करताना उन्द्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींचे त्वरित निराकरण करावे, असे निर्देश देण्यात आले. जनगणना ही देशसेवेची एक अत्यंत महत्वपूर्ण संधी असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. या प्रशिक्षणास बीड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, (सा.प्र.) उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, जनगणना संचालनालय, मुंबई येथील रमेश भोसले व मिलिंद पाटील, तसेच सर्व तहसीलदार, मुख्यधिकारी व विविध विभागांतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. २९ मार्च २०२६



## थोडक्यात



**बीड : शहरातील चंपावती विद्यालयाच्या उप मुख्याध्यापक पदी मनोज महाजन यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना सेवानिवृत्त मुख्याध्यापक व्यास सर, विजय संचेती, अक्षय डिजिटल चे शंकर सुरवसे.**

### विष्णुपंत जायभाय यांना पितृशोक

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील काकडहिरा येथील माजी सरपंच विष्णुपंत जायभाये व देविदास जायभाये यांचे वडील बाबुराव जायभाये यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.मृत्युसमयी त्यांचे वय १०७ वर्षे होते. त्यांच्यावर २८ मार्च रोजी शनिवारी सायंकाळी आठ वाजता काकहिरा येथे अंत्यत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



पाटोदा तालुक्यातील काकडहिरा येथील माजी सरपंच विष्णुपंत जायभाये व देविदास जायभाये यांचे वडील बाबुराव गणपती जायभाये हे १०७ वर्षे जगले. वयोमाना नुसार त्यांचे दिनांक २८ मार्च रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्यावर पाटोदा तालुक्यातील काकडहिरा येथे शनिवार दिनांक २८ मार्च रोजी सायंकाळी आठ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील नागरिक, नातेवाईक , मित्रपरिवार बीड शहरातील आणि पाटोदा शहरातील प्रतिष्ठित मोठ्या संख्येने उपस्थित होते. जायभाये परिवाराच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.



### युसूफवडगांव विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न


युसुफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथील युसूफवडगांव माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालयात २००५ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा गेट-टु गेदर कार्यक्रम संपन्न झाला.

श्रीराम नवमीचे औचित्य साधून माजी विद्यार्थी मेळाव्याचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य श्री.अंकुश भोसले तसेच प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य व्ही.जी शिंदे माजी प्राचार्य जाधव माजी,पर्यवेक्षक मस्के,माजी पर्यवेक्षक आर.खरबड लिंबागणेश संस्थेचे पर्यवेक्षक हावळे तसेच इतर शिक्षक उपस्थित होते या कार्यक्रमात विविध मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते तसेच कार्यक्रमांमध्ये शालेय जिवनातील आठवणींना उजाळा देण्यात आला.यावेळी या माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या कंपाऊंडसाठी २१ हजार रुपयांची रोख देणगी दिली.सदर कार्यक्रमात हजर राहिलेल्या सर्व विद्यार्थी माजी विद्यार्थी शिक्षक यांनी समाधान व्यक्त केले अनेक वर्षानंतर एकत्र आले याचे समाधान सर्व माजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते.

# रब्बी हंगामातील ‘ई-पीक पाहणी’ नोंदणीस ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ-तहसिदार वैशाली पाटील

## आष्टी तालुक्यात फक्त ५५.६९% नोंद पूर्ण



**आष्टी । प्रतिनिधी**

रब्बी हंगाम २०२५-२६ मधील पिकांची ‘ई-पीक पाहणी’ ( ) मोबाईल ॲपद्वारे नोंदणी करण्यासाठी शासनाने ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. आष्टी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या पिकांची नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

शासकीय आकडेवारीनुसार, आष्टी तालुक्यात रब्बी हंगामातील पीक नोंदणी अद्याप समाधानकारक झालेली नसून केवळ ५५.६९ टक्के क्षेत्राचीच नोंदणी पूर्ण झाली आहे. अनेक शेतकरी तांत्रिक अडचणी, मोबाईल ॲपचा अभाव किंवा माहितीअभावी नोंदणीपासून वंचित राहिल्याचे समोर आले आहे. त्यामुळे कोणताही शेतकरी शासकीय लाभांपासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाने ही मुदतवाढ दिली आहे.

ई-पीक पाहणी नोंदणी ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असून त्याचा उपयोग विविध शासकीय योजनांमध्ये केला जातो. नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास मिळणारी मदत, पीक विम्याच्या दाव्यांची पूर्तता, बँकांकडून पीक कर्ज मिळवण्यासाठी सातबारावरील पीक नोंद, तसेच शासनाच्या विविध अनुदानित योजनांचा लाभ घेण्यासाठी अचूक पीक नोंदणी आवश्यक ठरते.ज्या शेतकऱ्यांची नोंदणी अद्याप प्रलंबित आहे, त्यांनी आपल्या गावातील तलाठी, कृषी सहाय्यक किंवा डिजिटल सहाय्यक ( ) यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा. सहाय्यक स्तरावरून ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३१ मार्चपर्यंतचा अवधी उपलब्ध असून, शेवटच्या क्षणाची गर्दी टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

“तालुक्यातील रब्बी हंगामाची पीक पाहणी १०० टक्के पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांनी कोणतीही तांत्रिक अडचण असल्यास त्वरित संबंधित ग्राम महसूल अधिकारी किंवा मंडळ अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, जेणेकरून भविष्यात पीक विमा किंवा नुकसान भरपाई मिळवताना अडचणी येणार नाहीत.

-वैशाली पाटील,तहसीलदार

# निवडणूक कर्तव्यात हलगर्जीपणा भोवला ; बीएलओविरुद्ध गुन्हा दाखल

परभणी । प्रतिनिधी

परभणी विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या मतदार यादी सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेदरम्यान निवडणूक कर्तव्यात हलगर्जीपणा करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याविरुद्ध (बीएलओ) तहसील प्रशासनाने कडक कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे निवडणूक प्रक्रियेतील शिस्त व जबाबदारीबाबत प्रशासनाचा कठोर संदेश पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

मतदार यादीतील नावांचे अचूक मॅपिंग करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. २००२ मधील मतदार यादीतील नोंदींचे २०२४ च्या अद्ययावत यादीशी तंतोतंत जुळवाजुळव करणे ही या मोहिमेची मुख्य जबाबदारी आहे. मात्र, या संवेदनशील प्रक्रियेत नियुक्त करण्यात आलेले डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम शाळेतील शिक्षक सय्यद फरहान सय्यद रहीम बी.एल.ओ.ने आपल्या कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर केल्याचे समोर आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित शिक्षकास मतदान केंद्र क्र. ९६/२२२ वर बी.एल.ओ. म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्यांनी १३ मार्च रोजी कर्तव्य स्वीकारले, मात्र त्यानंतर त्यांनी प्रत्यक्षात कोणतेही काम न करता निवडणूक विभागाच्या सूचनांकडे दुर्लक्ष केले. विभागाकडून वारंवार दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही. काही वेळा त्यांचा मोबाईल बंद असल्याचेही आढळून आले. या प्रकारामुळे मतदार यादी पुनरीक्षणाच्या महत्त्वाच्या कामात अडथळा निर्माण झाला असून संबंधित मतदान केंद्रातील मतदारांच्या नोंदींच्या अचूकतेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ही बाब गंभीर स्वरूपाची मानत नायब तहसीलदार (निवडणूक) सुनील कांबळे यांनी तातडीने संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली. लोकप्रतिनिधी अधिनियम १९५० च्या कलम १३४ अन्वये संबंधित बी.एल.ओ. विरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणूक कर्तव्यातील ही निष्काळजीपणा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन मानून प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे.दरम्यान, तहसील प्रशासनाने स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा किंवा आदेशाचे उल्लंघन सहन केले जाणार नाही. निवडणूक कामकाजात सहभागी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे कर्तव्य बजावावे, अन्यथा अशाच प्रकारची कडक कारवाई करण्यात येईल. या घटनेमुळे निवडणूक यंत्रणेतील शिस्तीचे महत्त्व अधोरेखित झाले असून, इतर कर्मचाऱ्यांसाठीही हा धडा ठरणार आहे.

## उजनीचे पाणी मांजरा धरणात आणा -खा.बजरंग सोनवणे




नवी दिल्ली । वृत्तसेवा

मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी आणि बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्यांसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी दि.२७ मार्च रोजी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवाज उठवला. सोलापूरच्या उजनी धरणातून मांजरा नदीमार्गे मांजरा धरणात पाणी आणण्याचा प्रकल्प त्वरित मार्गी लावावा, अशी आग्रही मागणी करत त्यांनी बीडच्या दुष्काळी परिस्थितीकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

दिल्लीत सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीडचे खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी दुष्काळ आणि अस्मानी संकटाबाबत खा.सोनवणे यांनी आपल्या भाषणात बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. ते म्हणाले की, बीडचा शेतकरी दरवर्षी दुष्काळाच्या झळा सोसतोय. यावर्षी त्यात वादळ, अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाची भर पडली आहे. निसर्गाच्या या लहरीपणामुळे कष्टाचे पीक डोळ्यादेखत मातीत जात असून, शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. या अस्मानी आणि सुलतानी संकटामुळे शेतकरी आत्महत्या करत असून ही बाब अत्यंत गंभीर आणि वेदनादायक असल्याचे त्यांनी नमूद केले. बीड जिल्ह्यातील दुष्काळावर तोडगा काढण्यासाठी बाहेरून जिल्ह्यात पाणी आणल्याशिवाय पर्याय नाही. बीड जिल्ह्याला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्यासाठी उजनीचे पाणी मांजरा धरणात आणणे हाच एकमेव पर्याय असल्याचे सोनवणे यांनी ठामपणे सांगितले. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास बीडच्या शेतकऱ्यांसाठी ते जीवनदायी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# स्मरणशक्ती व आकलन तंत्र विकसित केले तरच मुलाखत यशस्वी होईल -सुधीर शर्मा

माजलगाव । प्रतिनिधी

अभ्यास हा कोणत्याही स्वरूपातील असो परंतु त्याच्या मेहनतीची पावती मुलाखत यशस्वी झाल्यानंतर येते म्हणून स्मरणशक्ती विकसित करण्याचे तंत्र हे कौशल्यपूर्ण पद्धतीने लक्षात घेतले पाहिजे असे प्रतिपादन प्रमुख व्याख्याते सुधीर शर्मा (राजस्थान )यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात 'परीक्षा व मुलाखत तंत्र कौशल्य या विषयावर व्याख्यान देत होते.महाविद्यालयाच्या विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे, विद्यापीठ परीक्षा विभाग प्रमुख डॉ सीताराम इंगोले यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांचा परिचय उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे यांनी दिला. प्रमुख मार्गदर्शक सुधीर शर्मा म्हणाले की, सलग वाचन करण्यापेक्षा छोटे टप्पे करत वाचून लक्षात ठेवता येते. चित्ररूपाने माहिती लक्षात ठेवत आकलन वाढवता येते. मुलाखती मध्ये यश मिळवण्यासाठी आत्मविश्वासा सोबत स्वच्छता, नीट नेटके पणा, उच्चार स्पष्टता आवश्यक आहेअसे प्रतिपादन त्यांनी केले. या शिवाय विद्यार्थ्यांचे त्यांनी विविध प्रश्नोतराच्या माध्यमातून शंका निरसन केले. याप्रसंगी मान्यवरांचे आभार डॉ. गोरखनाथ फसले यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ सीताराम इंगोले यांनी केले.या व्याख्यानप्रसंगी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पैठण येथे महिला मेळावा उत्साहपुर्ण वातावरणात संपन्न

युसुफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील पैठण येथे केंद्रस्तरीय महिला मेळावा अर्थात सन्मान स्त्री शक्तीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते हा कार्यक्रम अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केज पंचायत समितीच्या ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मुमताज पठाण मॅडम या होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून पैठणच्या सरपंच जयश्रीताई चौधरी पाथरा गावच्या सरपंच अपर्णाताई पवार तसेच सावळेश्वरच्या डॉक्टर भाग्यश्रीताई मस्के मुख्याध्यापक सुशिलकुमार गायकवाड,केंद्रप्रमुख संजय चवरे,अर्जून बोराडे,तुकाराम देशमुख,मुख्याध्यापक सुरेश काळे हे होते.यावेळी पैठण गावातील ज्येष्ठ नागरिक तथा आदर्श माता श्रीमती गजराबाई प्रभाकर सरवदे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच सौ संजीवनीताई केंद्रे,सौ.ज्योतीताई चवरे,सुधेशनाताई देशमुख,मिराताई बोराडे,सुरेखाताई भोसले,सविताताई जाधव,बबीताताई गायकवाड,अश्विनीताई चौधरी,सुरेखाताई काळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

तसेच यावेळी पैठण केंद्रांतर्गत सर्व गावातील आदर्श माता सामाजिक कार्यकर्त्या व कार्यरत सर्व जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षिकांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रीय मुख्याध्यापक गोविंद मुळे,केंद्रप्रमुख अण्णासाहेब जाधव व सर्व शाळांचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

# यशोधरा बुद्ध विहारात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना

### विविध कार्यक्रमांचे आयोजन; राधाबाई वाघमारे यांची संकल्पपूर्ती व भिकाजीराव वाघमारे यांच्या पावन स्मरणार्थ भिम प्रतीरुपाच दान

माजलगाव । प्रतिनिधी

येथील फुले नगर भागातील यशोधरा बुद्ध विहार येथे शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ रोजी भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य मूर्तीचा प्रतिष्ठापना सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न होणार आहे. हा सोहळा कालकथित राधाबाई भिकाजीराव वाघमारे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आणि कालकथित भिकाजीराव किसन वाघमारे (माजी जि.प. सदस्य, बीड) यांच्या पावन स्मरणातून आयोजित करण्यात आला आहे.



दिवसभर भरगच्च कार्यक्रम आयोजन

मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त दिवसभरात तीन सत्रांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रथम सत्र (सकाळी ९:३० वा.): पूजनीय भिक्खू संघाच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात येईल.

द्वितीय सत्र (सकाळी १०:३० वा.): डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात येईल. ही मिरवणूक यशोधरा बुद्ध विहार (फुले नगर) पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे पुन्हा विहार येथे येईल.

तृतीय सत्र (दुपारी १२:०० वा.): पूजनीय भिक्खू संघ आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची रीतसर प्रतिष्ठापना केली जाईल.

प्रमुख उपस्थिती आणि मार्गदर्शन

या सोहळ्याला पु.भदंत धम्मशील थेरो (शिवणी), पु.भदंत पिंडोल (फुले पिंपळगाव) आणि पु.भदंत संघप्रिया थेरो (छत्रपती संभाजीनगर) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली धम्मदेसना संपन्न होईल.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा.बाबुरावजी पोटभरे (संस्थापक, बहुजन विकास मोर्चा) भूषवणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून मा.आ.प्रकाशदादा सोळंके (आमदार, माजलगाव विधानसभा) तर प्रमुख उपस्थिती मध्ये शिफा बिलाल चाऊस नवनिर्वाचित नगराध्यक्षा माजलगाव, राहुल सूर्यतळ पोलीस निरीक्षक माजलगाव, दयानंद भाऊ स्वामी, सहालभैय्या चाऊस, डॉ.मिलिंद आव्हाड, श्रीहरी नाना मोरे, विजय दादा साळवे, कचरू तात्या खळगे, डॉ.प्रकाश आनंदगावकर, डॉ.श्रीराम खळगे, प्रकाश बन्सी कांबळे, अविनाश तात्या जावळे, नवनाथ धाईजे, धम्मानंद साळवे, भीमराव आप्पा टाकणखार, डॉ.अशोकराव तिडके, ड.नरहरी कांबळे, अभिजीत भैय्या पोटभरे, सदानंद भैया प्रधान, अशोक लांडगे सर, सचिन जावळे, विजय शिंदे, राज अहमद सय्यद नूर, प्रशांत शेटे, मेहमूद कुरेशी, जुनेद खान पठाण, सचिन डोंगरे, अंकुशराव जाधव, राजेश घोडे, राजेश साळवे,



अविनाश बनसोडे, राकेश साळवे, भास्करराव घाडगे, महेंद्र टाकणखार, ड.रवींद्र टाकणखार, राहुलकुमार टाकणखार सर, ड.सुजीत कांबळे, सदाशिव भालेराव, के.व्ही साळवे, धम्मचारी अमोलरत्न, डॉ.भागवत साळवे आदी मान्यवर उपस्थित तसेच माजलगाव शहरासह जिल्ह्यातील विविध राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

कालवश, भिकाजीराव वाघमारे यांच्या परिवारातील विद्याताई साहेबराव निसर्गध, रोहिणी निवृत्ती भाले, सुनिता भिमराव टाकणखार, शालिनी अर्जुन गणकवार, सीमा ओमप्रकाश टाकणखार, योगिता कपिल गणकवार, प्रतिभा वसंत पंडित, अनंत नामदेव वाघमारे व यशोधरा बुद्ध विहार ट्रस्टच्या वतीने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. ट्रस्टचे अध्यक्ष प्रा.आर.एम. कांबळे, उपाध्यक्ष सुशिलाताई चांदमारे, सचिव बाबासाहेब जाधव सर व सर्व सदस्य या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.सधम्म सेवा संघ, भारतीय बौद्ध महासभा आणि त्रिरत्न बौद्ध महासंघ या धार्मिक संघटनांचे विशेष सहकार्य या सोहळ्याला लाभले आहे. आयोजकांनी सर्व उपासक-उपासिकांना पांढरे वस्त्र परिधान करून या मंगलप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## पान ६ वरुन...

### सामाजिक सलोखा जपण्यासाठी

बीड नगर पालिकेतील सत्ता बदला नंतर शहरातील विकास कामे आणि सलोखा गतिमान झाला आहे . मुजीब पर्वाच्या काळात बीड नगर पालिका पहिल्यांदा ईद मिलाद घेऊन हिंदू मुस्लिमाना एकत्रित सलोख्याचा गोडवा दिला जाणार आहे .या उपक्रमाने शेख मुजीब यांचा व्यापक राजकीय सामाजिक प्रगल्भ भूमिकेचे कौतुक होत आहे.....

ऐतिहासिक ईद मिलाद

बीड नगर पालिकेतील सत्ता बदला नंतर शहरातील विकास कामे आणि सलोखा गतिमान झाला आहे . मुजीब पर्वाच्या काळात बीड नगर पालिका पहिल्यांदा ईद मिलाद घेऊन हिंदू मुस्लिमाना एकत्रित सलोख्याचा गोडवा दिला जाणार आहे .या शिवछत्र परिवाराच्या मार्गदर्शनात उपक्रमाने शेख मुजीब यांचा व्यापक राजकीय सामाजिक प्रगल्भ भूमिकेचे कौतुक होत आहे.

### श्री क्षेत्र लाटे बाभळगाव

यावेळी रामायणाचार्य ह भ प दत्ता महाराज जाधव लऊळकर, ह भ प अशोक महाराज लाटे, ह भ प मारुती महाराज सुरवसे, डॉ अशोक घुबडे, डॉ गिरीश कुलकर्णी, मंदिराचे मुख्य पुजारी लक्ष्मण तात्या जगताप, हनुमान मंदिर विश्वस्त संस्थेचे सचिव चंद्रकांत लाटे सर, सुवर्णकार असोसिएशन चे तालुका अध्यक्ष रामराजे रांजवण, ग्राम अभियान प्रतिनिधी संग्राम ठोंगे, परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अड कॅन्सर रिसर्च सेंटर माली पारगाव येथील डॉ पलाश गोहाड, डॉ शैलजा कोंडेवाड, डॉ वहिदा खान, डॉ अनुष्का कुलकर्णी, डॉ प्रेरणा भोईर, डॉ मनिषा होके, डॉ शामल चव्हाण, माजलगाव तालुका प्रतिनिधी योगेश कराड, आरोग्य दुत जिल्हा प्रतिनिधी शिवशंकर भंडारे तसेच ग्रामस्थ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबीराचा लाटे बाभळगाव व पंचक्रोशीतील शेकडो रुग्णांनी लाभ घेतला. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी सर्व ग्रामस्थ व श्री स्वामी समर्थ सेवेकरी यांनी प्रयत्न केले.

### मतदार याद्यांचा विशेष सखोल

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी करणार आहेत. मा.विभागीय आयुक्त संभाजीनगर यांनी याबाबत विभागातील सर्व जिल्हाधिकारी, आयुक्त महानगरपालीका व क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांची दिनांक २३.०३.२०२६ रोजी बैठक घेडुन कामकाजाचा आढावा घेतला व मार्गदर्शन केले.करीता या राष्ट्रीय कामासाठी मतदार केंद्रनिहाय नियुक्त केलेले इडज (मतदान केंद्रस्तरीय अधिकारी)यांना आवश्यक ते सहकार्य नागरीकांनी करावे असे अवाहन मतदार यादी निरिक्षक तथा विभागीय आयुक्त श्री. जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

# केंद्र सरकारने तेलबिया आणि कडधान्यांची १०० टक्के खरेदी करावी; संसदेच्या कृषी समितीची शिफारस

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**आयातीवरील खर्च कमी करण्यासाठी तेलबिया आणि कडधान्यांची २५ टक्क्यांऐवजी १०० टक्के हमीभावाने खरेदी करावी, यासह विविध शिफारशी संसदेच्या कृषी स्थायी समितीने केल्या आहेत. या समितीने ३३ वा अहवाल लोकसभेत सादर केला. यामध्ये देशाचे खाद्यतेल आणि कडधान्य आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याची शिफारस करण्यात आली आहे.**

देशातील खाद्यतेल आणि कडधान्य आयातीचा फटका शेतकऱ्यांना बसत असल्याच्या मुद्द्याकडे समितीने लक्ष वेधलं आहे. दरवर्षीच्या खाद्यतेलाच्या अंदाजे ५६ टक्के आणि कडधान्याच्या २१.३ लाख टनांच्या आयातीमुळे शेतकऱ्यांना फटका बसत असून परकीय चलनावर दबाव येत असल्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे देशातील शेतकऱ्यांना दरातील चढ-उतारापासून वाचवण्यासाठी सरकारने आयात शुल्कात बदल करणारी लवचिक पद्धत आणण्याचा विचार करावा, अशी शिफारस करण्यात आली आहे.



केंद्र सरकारने पीएम-आशा योजनेंतर्गत खरेदीचा विस्तार करून १०० टक्के तेलबिया खरेदी कराव्यात. तसेच तूर, उडीद, मसूर यासारख्या प्रमुख कडधान्यांची संपूर्ण खरेदी करावी. त्यासाठी डिजिटल पोर्टल सुरु करून २४ तास शेतकऱ्यांना उपलब्ध असलेली हेल्पलाईन सुरु करण्यासह दुर्गम भागात जास्तीत-जास्त खरेदी केंद्र स्थापन करण्याची शिफारसही करण्यात आली आहे. तसेच जर जागतिक बाजारात पाम तेलाचा दर प्रति टन ८०० डॉलरपेक्षा खाली आला, तर त्यावर २०% अतिरिक्त शुल्क लावावे, असेही सुचवले आहे. कमी उत्पादकता ही मोठी समस्या असल्याचे सांगत समितीने अधिक उत्पादन देणारे आणि हवामानाला तोंड देणारे नवे वाण तयार करण्यासाठी सीआरआयएसपीआर आणि मार्कर-असिस्टेड सिलेक्शनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानात जास्त गुंतवणूक करण्याची गरज व्यक्त केली आहे. तसेच भारतीय कृषी संशोधन परिषदेने २०२८ पर्यंत प्रदेशानुसार योग्य वाण विकसित करून उपलब्ध करावेत, आणि २०३० पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात सीड हब उभारून बियाणे बदलण्याचे प्रमाण वाढवावे, अशी शिफारस करण्यात आली आहे. केंद्र सरकारने साथी पोर्टलचे व्यापक 'नॅशनल सीड ग्रिड'मध्ये रूपांतर करण्याचा प्रस्तावही या समितीने मांडला आहे. जेणेकरून संपूर्ण बियाणे पुरवठा साखळी डिजिटल पद्धतीने जोडली जाईल, क्यूआर कोडद्वारे ट्रॅकिंग शक्य होईल आणि अनुदानातील गैरव्यवहार कमी होण्यास मदत होईल. तसेच शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी, बियाण्यांच्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि बनावट बियाण्यांमुळे नुकसान झाल्यास भरपाई देण्यासाठी स्वतंत्र राष्ट्रीय नियामक संस्था स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

### "पाणी व्यवस्थापनावर भर देण्याची सूचना

पंतप्रधान प्रति थेंब अधिक पीक योजनेतून सिंचनाचा विस्तार सूक्ष्म सिंचन शेततळी आणि आयओटीआधारित पाणी व्यवस्थापनावर भर देण्याचे सुचवले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्या मजबूत करणे, प्रक्रिया उद्योग उभारणे आणि भारत डाळसारख्या उपक्रमांचा विस्तार करण्याबरोबरच स्वस्त खाद्यतेलासाठी भारत ऑइल हा नवीन ब्रँड सुरू करण्याची शिफारसही या समितीने केली आहे.



## गायीला दररोज इतके लिटर पाणी पाजा; गाय देईल २० लिटरपर्यंत दूध!

राज्यामध्ये शेतकरी मोठ्या संख्येने दुग्ध व्यवसाय करत आहेत. दुग्ध व्यवसाय करताना शेतकऱ्यांना उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये दूध उत्पादनात घट होणे ही सर्वात मोठी समस्या असते. विशेष म्हणजे जनावरांकडे दुर्लक्ष झाल्यास दूध उत्पादनात घट होण्यासह अनेक समस्या उद्भवतात. परिणामी, शेतकऱ्यांनी दुधाळ जनावरांची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. यात प्रामुख्याने शेतकऱ्यांनी जनावरांच्या चाऱ्यासह त्यांच्या पिण्याच्या पाण्याकडे विशेष लक्ष देणे खूप गरजेचे असते.

**दररोज किती पाणी आवश्यक?**

दूध व्यवसाय करताना शेतकरी प्रामुख्याने दुधाळ जनावरांच्या चाऱ्याकडे तर लक्ष देतात. मात्र, दूध उत्पादन वाढीसाठी दुधाळ गायींना चाऱ्यासोबत वेळोवेळी पाणी पाजणे देखील आवश्यक असते. गायीने अधिक दूध देण्यासाठी तिने अधिकाधिक पाणी पिणे आवश्यक असते. अर्थात एखादी गाय दररोज दोन वेळा २० लिटर दूध येत असेल. तर अशा गायीला २४ तासांमध्ये कमीत कमी १०० लिटर पाणी दिले जाणे आवश्यक आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांनी कमीत कमी तीन वेळा दुधाळ गायीला-म्हशीला पाणवठ्यावर नेणे आवश्यक असते.

**चारा/पाणी यांचे प्रमाण :**

इतकेच नाही तर एखाद्या गायीने जर १२ किलो चारा खाल्ला असेल तर अशा गायीला तो चारा पचवण्यासाठी ५० लिटर पाण्याची आवशक्यता असते. थोडक्यात काय तर एक गाय किंवा म्हशीने दिवसभरात १०० ते १५० लिटर पाणी पिणे गरजेचे असते. जेणेकरून अशी गाय किंवा म्हैस २० लिटर दूध देण्यास सक्षम ठरते. पाणी शेतकऱ्यांनी दुधाळ जनावरांना चारा टाकण्याचे प्रमाण आणि त्या तुलनेत पाणी पाजण्याचे प्रमाण निरीक्षणातून लक्षात घेणे आवश्यक असते.

**अधिक पाणी पिण्यासाठी करा 'हे' उपाय :**

सध्याच्या घडीला ग्रामीण भागात सहसा जनावरांसाठी सिमेंटच्या पाण्याच्या टाक्या आढळतात. दुधाळ जनावरांनी अधिकाधिक पाणी प्यावे. यासाठी शेतकऱ्यांनी या टाक्या नेहमी स्वच्छ ठेवल्या पाहिजेत. किमान पंधरा दिवसांतून एकदा संपूर्ण टाकी कोरडी करून त्याला आतून चुना लावावा. त्यामुळे त्यात शेवाळ वाढणार नाही तसेच पाणी थंड राहून त्यातून कॅल्शिअमचाही थोडा पुरवठा होईल. याशिवाय गढूळ पाणी स्वच्छ करण्यासाठी पाण्यात तुरटी फिरवणे सारखा सोपा उपाय करू शकतो. बाजारात पाणी स्वच्छ करण्यासाठी सॅनिटायझर टॅबलेट ही उपलब्ध आहेत. पाणी स्वच्छ असल्यास दुधाळ गायी/म्हशी अधिक पाणी पितात.

## जपानी रेड डायमंड पेरुची 'अशी' करा शेती !



**रेड डायमंड पेरु शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. या पेरुचा दर खूप जास्त असून, बाजारात १०० ते १५० रुपये किलोने विकला जातो. हा पेरु त्याच्यातील चव आणि गोडवा यासाठी खूप लोकप्रिय आहे. या पेरुची लागवड करून शेतकरी काही वर्षांत श्रीमंत होऊ शकतात.**

भारतातील बहुतेक शेतकरी पारंपारिक शेतीऐवजी अपारंपारिक पिकांची लागवड करत आहेत. या प्रयत्नात ते यशस्वी होत आहेत आणि चांगली कमाई करत आहेत. बहुतांश शेतकरी विविध प्रकारच्या फळांची लागवड करतात. आजकाल रेड डायमंड पेरू देशातील शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. जपानी रेड डायमंड पेरुचा दर खूप जास्त आहे, बाजारात १०० ते १५० रुपये किलो दराने विकला जातो. देशातील अनेक राज्यांमध्ये शेतकर्यांनी या जातीच्या पेरुची लागवड करण्यास सुरुवात केली असून त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे.

**योग्य हवामान आणि माती :** रेड डायमंड पेरुच्या लागवडीसाठी १० अंश ते ४२ अंश सेल्सिअस तापमान योग्य मानले जाते. परंतु तापमान थोडे कमी झाले तरी त्याचा उत्पादनावर परिणाम होत नाही. या जातीच्या पेरुच्या लागवडीसाठी काळी किंवा वालुकामय चिकणमाती चांगली मानली जाते, तसेच जमिनीचा (सामू) ७ ते ८ असावी.

**रोप लागवड आणि रोपातील अंतर :** जपानी रेड डायमंड पेरुची रोपे लावताना तुम्हाला त्यांच्यामधील जागेची विशेष काळजी घ्यावी लागेल. एका ओळीपासून दुसर्या ओळीपर्यंतचे अंतर सुमारे ८ फूट ठेवावे आणि रोपापासून रोपापर्यंतचे अंतर ६ फूट ठेवावे. चांगल्या वाढीसाठी शेतकर्यांना वर्षातून दोनदा रोपांची छाटणी करावी लागते. जेव्हा त्याचे फळ चिकूच्या आकाराचे होते तेव्हा आपण ते फळ पिशवी किंवा वर्तमानपत्राने झाकून ठेवावे. असे केल्याने पेरू पिकण्याची प्रक्रिया सुधारते आणि फळांवर डाग दिसत नाहीत.

**खत आणि सिंचन :** रेड डायमंड पेरुची लागवड करण्यासाठी शेतकर्यांनी शेणखत आणि गांडूळखत यांचा पिकांमध्ये वापर करावा. याशिवाय, एनपीके सल्फर, मॅग्नेशियम सल्फेट, कॅल्शियम नायट्रेट आणि बोरॉन यासारखी रासायनिक खते वापरू शकता. रेड डायमंड पेरुच्या झाडांना पाणी देण्यासाठी शेतकरी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करतात. याशिवाय वेळोवेळी सामान्य सिंचन देखील आवश्यक आहे.

**रेड डायमंड पेरूपासून होणारी कमाई :** जपानी रेड डायमंड पेरू सामान्य पेरुसारखा दिसतो. पण आतून तो टरबूजासारखा लाल असतो आणि बाहेरून तो नाशपातीसारखा गोड असतो. बाजारपेठेत स्थानिक पेरुचा भाव ५० ते ६० रुपये प्रति किलो तर जपानी रेड डायमंड पेरू १०० ते १५० रुपये किलो दराने विकला जातो. या पेरुची लागवड करून शेतकरी सामान्य पेरूपेक्षा ३ पट अधिक उत्पन्न मिळवू शकतात. या जातीच्या पेरुची लागवड करण्यासाठी खर्च सुद्धा कमी येतो.

## उष्णतेमुळे केळी लागवड रखडली

**जळगाव: खानदेशात उष्णता वाढत आहे. कमाल व किमान तापमान सतत वाढत असून, उष्णतेचे चटके केळी व अन्य पिकांना बसत आहेत. अशात केळीचे कंद, रोपे वाढविणे, जगविणे अशक्य होत असून, अनेकांनी केळी लागवड टाळली आहे.**

केळीचे कंदही खानदेशात सध्या फारसे उपलब्ध नाहीत. काही भागात कंद आहेत. पण शेतकरी कंद लागवड टाळत आहेत. कारण उष्णतेत कंद जगविणे शक्य नाही. अनेक शेतकऱ्यांनी मागील पंधरवड्यात केळी रोपांची लागवड केली. केळी रोपांभोवती धैंचा, पांढरे क्रॉप कव्हर लावले, पण तरीदेखील रोपांना उष्णतेचा फटका बसत आहे. असात केळी पिकात तूट येईल, अशी स्थिती आहे. केळी लागवड मार्च ते एप्रिलअखेर बंद राहील, असे दिसत आहे. अनेक शेतकऱ्यांनी मे महिन्यात केळी लागवडीचे नियोजन केले आहे. मे महिन्याच्या अखेरीस व जूनमध्ये लागवड होईल, अशी स्थिती आहे. सध्या आगाप केळी बागांची लागवड शेतकरी करीत होते. त्यासाठी रोपांची आगाऊ नोंदणी शेतकऱ्यांनी केली होती. रोपांचा पुरवठा झाल्याने शेतकऱ्यांनी केळी लागवड केली, पण आता उष्णता वाढल्याने ही लागवड यशस्वी करताना नाकीनऊ येत आहेत. काही शेतकऱ्यांनी मागील आठवड्यात केळी लागवड केली होती. परंतु उष्णता ४० अंश सेल्सिअसवर पोचली. यामुळे काळ्या कसदार जमिनीत कंद उगवणीवर परिणाम जाणवत आहे. यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. अशा स्थितीत पीक वाचविण्याची धडपड शेतकरी करीत आहेत.

## या पाच फवारण्या करतील आंबा मोहराचे संरक्षण

**आंब्याला मोहोर आल्यास आपल्याला आंब्याच्या मोहोरा वर कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. जसे कि तुडतुडे, कोळी, पिठ्या ढेकूण, करपा, भुरी, इत्यादी आणि या वेळी व्यवस्थित नियंत्रण करणे खूप गरजेचे असते. शेतकरी मित्रांनो आंबा पिकाच्या मोहोर व्यवस्थापनासाठी आंब्याच्या मोहोराच्या ज्या वेगवेगळ्या अवस्था असतात आणि या वेगवेगळ्या अवस्थेमध्ये ज्या वेगवेळ्या पंच फवारण्या घेतल्या जातात त्या फवारण्या कश्या कराव्यात ते सविस्तर खालील प्रमाणे आहे.**



**पहिली फवारणी :** या मध्ये फवारणी आंब्याच्या पोपटी रंगाच्या पाली वर घेतल्या जाते. मोहोर येण्याच्या अगोदर या मध्ये डेल्टामेथ्रीन २.८ % ई सी फॉर्मुलेशन मधलं कीटक नाशक ९ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी घ्या. या मुळे सुरवाती अवस्थेत मध्ये आंब्याच्या मोहोरावर येणाऱ्या तुडतुड्या पासून संरक्षण होईल.

**दुसरी फवारणी :** दुसरी फवारणी पहिल्या फवारणीच्या १५ दिवस नंतर करावी. एक कीटक नाशक आणि एक बुरशीनाशकाची फवारणी करावी. कीटकनाशका मध्ये लाम्बडा सायलोथ्रीन ५ % इ सी फॉर्मुलेशन मधलं कीटक नाशक ६ मिली + हेक्साकोनॅझोल ५ % इ सी बुरशीनाशक १० मिलीप्रती १० लिटर पाण्यात घेऊन फवारणी करावी , या फवारणी मुळे आंब्याच्या मोहोराचे संरक्षण वेगवेगळ्या रस शोषक किडींन पासून तसेच वेगवेगळ्या बुरशीजन्य रोगांन पासून होते.

**तिसरी फवारणी :** तिसरी फवारणी दुसऱ्या फवारणीच्या १५ -२० दिवसांनंतर करावी. या मध्ये सुद्धा दोन घटक घेतल्या जातात एक कीटक नाशक आणि एक बुरशी नाशक , कीटकनाशका मध्ये इमाडिक्लोप्रिड १७. ८ % एस एल ४ मिली + कार्बनडीझम १२ % + मॅन्कोझेब ६३ % डब्लू ची हे संयुक्त बुरशीनाशक २० ग्राम प्रति १० लिटर पाण्यात घेऊन फवारणी करावी. या फवारणी मुळे आंबा पिकाचे मोहोराचे संरक्षण रसशोषक किडी तसेच करपा रोगापासून होते.

**चौथी फवारणी :** चौथी फवारणी तिसऱ्या फवारणीच्या १५-२० दिवसा नंतर करावी या फवारणी मध्ये सुद्धा एक कीटक नाशक + एक बुरशीनाशक घेतले जाते . कीटकनाशका मध्ये थायोमिथोक्साम २५% डब्लू जी ५ ग्राम + झीनेब ६८% + हेक्साकोनॅझोल हे संयुक्त बुरशी नाशक २० ग्राम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी घेतांना फवारणी हि संपूर्ण झाडावर घ्यायची आहे फक्त मोहोरावर न घेता. या फवारणीचा आंबा पिकाला असा फायदा होणार आहे कि वेगवेगळ्या रसशोषक किडी तसेच भुरी रोगा पासून चांगल्या प्रकारे संरक्षण होणार आहे.

**पाचवी फवारणी :** पाचवी फवारणी ही जैविक फवारणी घेतल्या जाते या मध्ये एक जैविक कीटकनाशक आणि एक जैविक बुरशीनाशक घेतले जाते. जैविक कीटकनाशक मध्ये व्हर्टिसिलिअम लेकानी आणि जैविक बुरशीनाशका मध्ये सुडोमोनास फ्लुरोसन्स ४० मिली प्रति १० लिटर पाणी घेऊन फवारणी करावी.

या मुळे वेगवेगळ्या रसशोषक किडी, मर रोग, करपा रोगाचा अतिशय चांगल्या प्रमाणात कंट्रोल होतो.

**आंबा फळ गळ नियोजन :** पाच फवारण्या झाल्या नंतर मोहोर व्यवस्थित सेट होईल. ज्या वेळेस फळे साधारण पाने ज्वारी च्या आकाराचे असतील त्या वेळेस एक जिब्रेलिक ॲसिड ची फगवारणी घेण्यात येते . या मध्ये जिब्रेलिक ॲसिड १ ग्रामी + ॲसिटोन ६० मिली + १०० ग्राम चिलेटेड झिंक १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी घ्यावी ( एक एकर साठी) या मुळे सेटिंग खूप चांगल्या प्रकारे होते व जास्तीत जास्त फळे झाडांवर लागतात , फळांची गाळ कमी होते व फळांचा आकार आणि संख्या सुरवाती पासूनच सुधारण्यास मदत होते.

**फवारणी करतांना काळजी :** फवारणी साठी पाण्याची मात्र अंदाज नुसार घ्याची आहे. खूप छोटी झाडे असतील तर ४ -५ लिटर पाणी लागते , माध्यम आकाराची झाडे असतील तर १५ लिटर पाणी लागते ,मोठी झाडे असतील तर १५ -२० लिटर पाणी लागते झाडांच्या वयानुसार , घेऱ्यानुसार, आकारमानानुसार, पाणी द्यायचे आहे. फवारणी साठी चांगल्या प्रकारचे मोजणं वापरावे. फवारणी घेतांना संपूर्ण बागे वर घ्या एखादं झाड चांगलं आहे त्या झाडाला सोडून द्यायचे नाही निरोगी असेल तरी फवारणी घ्या. त्या वर देखील खूप छोट्या प्रमाणात किंवा सुप्त अवस्थेमध्ये रोग व कीड असू शकते. फवारणी घेतांना शक्यता सकाळी १० च्या आधी किंवा सायंकाळी ४ च्या नंतर घायची आहे. फवारणी मध्ये स्टिकरचा वापर केला पाहिजे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६९९ : शिख धर्मगुरू श्री.गुरू गोबिंद सिंघ यांनी खालसा पंथ ची स्थापना केली.
१७२९ : थोरले बाजीराव पेशवे यांनी जैतपूर येथे महंमदशहा बंगश याचा पराभव केला.
१७५७ : प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी बंगालच्या नबाबाचा पराभव केला. या विजयामुळे ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा पाया घातला गेला आणी ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने कोलकाता काबीज केले.
१८४२ : अमेरिकन शल्यविशारद डॉ. क्रॉफर्ड लाँग यांनी शस्त्रक्रिया करताना भूल देण्यासाठी इथर या द्रव्याचा प्रथमच वापर केला.
१८५६ : पॅरिसचा तह झाल्याने क्रिमियन युद्ध संपले.
१८८१ : लोकमान्य टिळकांनी संपादित केलेल्या 'मराठा' या दैनिकाची सुरूवात झाली.
१८८५ : पुणे यथे फर्ग्युसन महाविद्यालय सुरू झाले.
१९०५ : मांचुरियातील पोर्ट ऑर्थर सिटी येथील लढाईत जपानी सैन्याने रशियाचा पाडाव केला. आशियाई देशाने युरोपातील देशाचा केलेला पराभव ही त्या काळातील अतिशय महत्त्वाची घटना होती.
१९२९ : इंग्लड ते भारत अशी विमानमार्गे साप्ताहिक टपालसेवा सुरु करण्यात आली.
१९३६ : मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची स्थापना
१९३९ : हेइंकेल १०० ह्या सैनिकी विमानाने ७४५ किमी / ताशी वेगाने उडण्याचा विक्रम केला.
१९४२ : दुसरे महायुद्ध जपानी फौजांनी मनिला, फिलिपाइन्सवर ताबा मिळवला.
१९४४ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी सोफिया, बल्गेरिया येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१९४५ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी न्यूरेम्बर्ग, जर्मनी येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१९५४ : राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी 'भारतरत्न' पुरस्कारांची स्थापना केली.
१९८९ : मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार सफदर हश्मी यांची नवी दिल्ली येथे पथनाट्य करत असतानाच निर्घृण हत्या
१९९८ : डॉ. सरोजिनी बाबर यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वसंत गोवारीकर यांच्या हस्ते सन्माननीय डी. लिट. पदवी प्रदान
२००० : संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा असलेल्या चलनी नाण्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते प्रकाशन.
२००० : पनामा सरकारने ८५ वर्षांच्या कालखंडानंतर पनामा कालव्याचा पूर्ण ताबा घेतला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४६ : फ्रांसिस गोया, स्पॅनिश चित्रकार.
१८३२ : व्हिंसेंट व्हान गॉ, डच चित्रकार.
१८५३ : डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉग यांचा जन्म. (मृत्यू: २९ जुलै १८९०)
१८९४ : इल्युशीन विमान कंपनी चे निर्माते सर्जी इल्युशीन यांचा जन्म. (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९७७)
१८९५ : सोविएत युनियनचे अध्यक्ष निकोलाय बुल्गानिन यांचा जन्म. (मृत्यू: २४ फेब्रुवारी १९७५)
१८९९ : बंगाली लेखक शरदेंन्दू बंदोपाध्याय यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९७०)
१९०६ : भारतीय भूदलाचे ६ वे सरसेनापती जनरल कोडेन्डेरा सुबय्या तथा के. एस. थिमय्या यांचा जन्म. (मृत्यू: १७ डिसेंबर १९६५)
१९०८ : अभिनेत्री देविका राणी यांचा जन्म. (मृत्यू: ९ मार्च १९९४)
१९२० : आयझॅक असिमॉव्ह अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथालेखक (मृत्यू: ६ एप्रिल१९९२)
१९३२ : हरचंदसिंग लोंगोवाल अकाली दलाचे अध्यक्ष (मृत्यू: २० ऑगस्ट १९८५)
१९३८ : वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम चे स्थापक क्लाउस स्च्वाब यांचा जन्म.
१९४२ : भाषातज्ज्ञ, कोशकार, लेखक आणि कवी वसंत आबाजी डहाके यांचा जन्म.
१९५९ : किर्ती आझाद क्रिकेटपटू आणि खासदार
१९६० : रमण लांबा क्रिकेटपटू (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९९८)
१९७७ : भारतीय संचालक आणि पटकथालेखक अभिषेक चोब्बे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३१६ : अल्लाउद्दीन खिलजी दिल्लीचा सुलतान (जन्म: )
१६६५ : मुरारबाजी, पुरंदर किल्ल्याला वेढा घालणाऱ्या दिलेरखानाशी झुंज दिलेला
१९३५ : मोरेश्वर वासुदेव तथा नरकेसरी अभ्यंकर स्वातंत्र्यसैनिक, टिळकांच्या विचारसरणीचे मध्य प्रांताचे काँग्रेस नेते, वकील (जन्म: १९ ऑगस्ट १८८६)
१९४३ : हुतात्मा वीर भाई कोतवाल (जन्म:)
१९४४ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (जन्म: २३ एप्रिल १८७३)
१९५२ : भूतानचे २ रे राजे जिग्मे वांगचुक यांचे निधन.
१९६९ : कवी व समाजसेवक वासुदेव गोविंद मायदेव यांचे निधन. (जन्म: २६ जुलै १८९४)
१९७६ : रघुवीर शंकर मुळगावकर, विख्यात चित्रकार, रंगसम्राट.
१९८१ : रीडर्स डॉजेस्ट चे निर्माते डेविट वलास यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८८९)
१९८९ : सफदर हश्मी मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार (जन्म: १२ एप्रिल १९५४)
१९९३ : एस. एम. पंडित, भारतीय चित्रकार.
१९९९ : विमला फारुकी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या आणि महिला चळवळीतील कार्यकर्त्या (जन्म:)
२००२ : आनंद बक्षी, हिंदी चित्रपटगीतकार.
२००२ : अनिल अग्रवाल पर्यावरणवादी (जन्म: ? ? १९४७)
२००५ : भारतीय लेखक आणि चित्रकार ओ. व्ही. विजयन यांचे निधन. (जन्म: २ जुलै १९३०)
२०१२ : कॅनेडियन-भारतीय समाजशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक अक्किला बेर्लास किंनी यांचे निधन.

# पक्ष विस्तार व बळकटीसाठी कार्यकर्त्यांनी योगदान द्यावे-जीवनराव गोरे

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची बीडमध्ये महत्त्वपूर्ण बैठक संपन्न!

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने बीड जिल्ह्यात संघटन विस्तार आणि बळकटीसाठी व्यापक नियोजन सुरू केले असून, लवकरच जिल्हाभर तालुकानिहाय बैठकींचे आयोजन करण्यात येणार आहे. या माध्यमातून पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी ठोस रणनीती आखली जाणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली.



राष्ट्रवादी भवन, बीड येथे जिल्हा पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या अध्यक्षते खाली जिल्हास्तरीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. बैठकीस जेष्ठ नेते अँड. डी. बी. बागल, माजी आमदार सय्यद सलीम भाई, माजी आमदार पृथ्वीराज साठे, युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब भाई शेख, प्रदेश उपाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, जेष्ठ नेते मोहनराव जगताप, प्रदेश सरचिटणीस राजाभाऊ फड, प्रदेश प्रवक्त्या अँड. हेमाताई पिंपळे, राज्य प्रवक्ते शिवराज बांगर, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, अँड. नारायणराव डक,सुभाष सपकाळ,युवक जिल्हाध्यक्ष सतिश शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष व विविध आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीची सुरुवात स्वर्गीय लोकनेते अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर संघटनात्मक बांधणी, पक्ष विस्तार, मजबुतीकरण आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सखोल चर्चा झाली.

यावेळी जीवनराव गोरे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पक्षाचे विचार, धोरणे आणि भूमिका समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे ही प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे. सातत्यपूर्ण लोकसंपर्क ठेवत जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम केल्यास पक्षाची विश्वासार्हता अधिक दृढ होईल.

बैठकीत कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले. सर्वांनी एकजुटीने काम करून पक्ष अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच प्रत्येक तालुक्यात संघटन विस्तारासाठी विशेष अभियान राबवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, युवक व महिला आघाड्यांना अधिक सक्रिय करण्यावर भर देण्यात येणार आहे. एकूणच, ही बैठक आगामी निवडणुकांच्या दृष्टीने दिशा ठरवणारी ठरली असून, राष्ट्रवादी काँग्रेस ( शरदचंद्र पवार ) पक्षाने बीड जिल्ह्यात आपली ताकद वाढवण्याचा स्पष्ट संकल्प केला आहे.

# मंठा शहरात रामनवमी उत्सव उत्साहात साजरा

मंठा । प्रतिनिधी

श्री रामनवमी निमित्त मंठा शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. येथील सरस्वती कॉलनीतील श्री राम मंदिरात हा उत्सव अत्यंत श्रद्धा, भक्तीभाव आणि उत्साहात संपन्न झाला. तसेच ब्राह्मण गल्लीतही श्री रामनवमी निमित्त पूजा - अर्चा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



सरस्वती कॉलनीतील श्रीराम मंदिराचे पुजारी साखरेकर महाराज यांनी श्रीरामाची आकर्षक व मोहक सजावट करून विधिवत पूजाअर्चा केली. तसेच ब्राह्मण गल्लीतही भक्तिमय वातावरण पाहावयास मिळाले.

प्रभूंच्या दर्शनासाठी दिवसभर भाविकांची रीघ सुरू होती. परिसरातील महिला व पुरुष भक्तांनी एकत्र येत श्रीरामाच्या भजनांनी वातावरण अधिकच पवित्र केले.

यावेळी 'राम कृष्ण हरी' प्रभातफेरीतून निघालेल्या रामधूनने संपूर्ण परिसर रामनामात तल्लीन झाला. भक्तांच्या मुखातून निघणाऱ्या नामस्मरणाने आणि टाळ-मृदंगाच्या गजराने वातावरण भारावून गेले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात नगरपंचायत चे सार्वजनिक बांधकाम समिती सभापती तथा नगरसेवक दीपक बोराडे व संघर्ष प्रतिष्ठान आणि रामभक्त युवकांनी भव्य स्टेज उभारून विविध भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन केले. या कार्यक्रमांनी परिसरात आध्यात्मिक ऊर्जा निर्माण झाली आणि सर्वत्र राममय वातावरण निर्माण झाले.

# राष्ट्रीय महामार्ग ६१ अवैध मुरूम उत्खनन ;लाखो रुपयांचा घोटाळा !

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील कल्याण विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग ६१ बीड जिल्ह्यातील पाडळशिंगी फाटा ते कल्याण या महामार्गाचे सिमेंट काँक्रिटीकरण काम सुरू असून रस्त्याच्या दुतर्फा मुरूम टाकून साईडपट्ट्या भरण्याचे काम सुरू आहे या महामार्गाचे काम अत्यंत निकृष्ट पद्धतीने केले आहे सदरील महामार्गाचे निकृष्ट काम केल्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने यापूर्वी टी एन टी इन्फ्रा प्रायव्हेट ठेका कंपनीला लेखी एन सी आर (नॉन परफॉर्म रिपोर्ट) पाठवून कारवाई करण्याचे पत्र दिले होते परंतु तरीही सदरील ठेका कंपनीने यात सुधारणा केली नाही बीड जिल्ह्यातील पाडळसिंगी फाटा ते खरवंडी कासार ते येळी इथपर्यंत केलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले आहे या कामाची राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने गुणवत्ता तपासणी करून सदरील टी अँड टी इन्फ्रा ठेका कंपनीला पूर्वीच्या एनसीआरचा संदर्भ घेऊन कायदेशीर दंड आकारण्यात यावा अशी मागणी माहिती अधिकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र जायभाये यांनी केली आहे.

कल्याण विशाखापट्टण राष्ट्रीय महामार्ग ६१ या महामार्गाचे काम निकृष्ट केले असल्याने खरवंडी कासार ते मीडसांगवी व टोलनाका ते येळी रस्त्याच्या अर्धवट पूलाच्या कामामुळे रात्री काम सुरू असलेल्या ठिकाणी सूचनाफलक नसल्याने जबरी अपघात झाले आहेत यात काही गृहस्थांना जीव गमवावा लागला तर काही ग्रहस्थ गंभीर जखमी झाले आहेत यावर टी एन टी इन्फ्रा एका कंपनीवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून जातात मृत झालेल्या व गंभीर जखमी झालेल्या गृहस्थांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

पाथर्डी तहसील कार्यालयातील माहिती अधिकार कायदा सन २००५ अन्वये राष्ट्रीय महामार्ग ६१ रस्त्याच्या साईड पट्ट्या भरण्यासाठी रॉयल्टी सहा लक्ष रुपये चलन भरल्याची माहिती प्राप्त आहे परंतु पाथर्डी तालुक्यातील कुठल्या गट नंबर क्षेत्रातून मुरूम उचलला किती उचलला कुठल्या प्राधिकृत अधिकाऱ्याने मोजमाप सहित मुरूम खोदण्याची प्रत्यक्ष किती परवानगी दिली पोहच पावत्या याची माहिती देण्यात आली नसल्याने अवैध मुरूम उत्खनन केल्याची शंका आहे यामुळे विभागीय आयुक्त नाशिक यांच्याकडे अपील करून अवैध मुरूम उत्खनन करून माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये माहिती दडवल्याबद्दल तहसील कार्यालयातील बड्या अधिकाऱ्याच्या निलंबनाची मागणी करणार आहे- प्रा.शैलेंद्र जायभाये (जिल्हाध्यक्ष-माहिती अधिकार महासंघ)

# अज्ञात वाहनाच्या धडकेत शेतमजूराचा जागीच मृत्यू

लातूर । प्रतिनिधी

राष्ट्रीय महामार्गावरील अहमदपूरहून लातूरकडे जाणाऱ्या चाकूर बायपासपासून १ किमी अंतररावर एका अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत शेतमजूराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (दि.२६) सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास घडली असून, वाहन चालक फरार झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राम गोरे (वय ७५, रा. चाकूर) हे एका शेतकऱ्याच्या शेतात शेतमजुरीचे काम करीत होते. गुरुवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास घरी जाण्यासाठी निघाले असताना राष्ट्रीय महामार्ग ओलांडत होते. त्याचवेळी अहमदपूरहून लातूरकडे वेगात जाणाऱ्या एका अज्ञात वाहनाने त्यांना उडवले. धडक इतकी भीषण होती की,त्या धडकेत राम गोरे यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच चाकूर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. अपघात करून पसार झालेल्या अज्ञात वाहनाचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून राम गोरे यांच्या पश्चात पत्नी व पाच मुले असा परिवार आहे.

# १८ तोळे सोने घेऊन बंगाली कारागीर पसार

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

दागिने बनविण्याचा बहाणा करून एका बंगाली कारागिराने शहरातील व्यापारी आणि सराफांचे तब्बल १८ तोळे सोने घेऊन पोबारा केला. हा प्रकार जुना बाजार भागात उघडकीस आला. मेघनाथ बिमल रॉय (४१, रा. हुगली, पश्चिम बंगाल) असे आरोपीचे नाव आहे. तो कुटुंबासह फरार झाला आहे.

फिर्यादी अब्दुल लतीफ अब्दुल कादर (४८, रा. जुनाबाजार) यांच्या तक्रारीनुसार, त्यांच्याच मालकीच्या घरात मागील १३ वर्षांपासून मेघनाथ हा कारागीर भाड्याने राहत होता. त्याचा विश्वास संपादन झाल्यामुळे फिर्यादीने सप्टेंबर २०२५ मध्ये त्याला ६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (कडा व अंगठी) नेकलेस बनवण्यासाठी दिले होते. केवळ फिर्यादीच नव्हे तर आरोपीने शहरातील इतर नामांकित सराफांनाही गंडा घातला आहे. उदय सराफ यांच्याकडून दागिने बनवण्यासाठी आणि दुरुस्तीसाठी घेतलेले सुमारे ५९ ग्रॅम ५०० मिली शुद्ध सोने, के.एम. गोल्ड (शेख कदीर) यांच्याकडून ग्राहकांना देण्यासाठी नेलेले ३६ ग्रॅमचे सोन्याचे झुमके आणि २१ ग्रॅम ६०० मिलीच्या सोन्याच्या वाटी असा ऐवज त्याने लंपास केला. दिवाळीच्या हंगामाचे कारण सांगून आरोपीने वेळकाढूपणा केला. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी फिर्यादी त्याच्या घरी गेले असता, घराचा दरवाजा उघडा होता मात्र आरोपी कुटुंबासह आणि दुकानातील साहित्यासह गायब झाला होता. त्याचा मोबाईल क्रमांकही बंद येत



असल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले.

२० वर्षांच्या विश्वासाला तडा

आरोपी रॉय हा उदय सराफ यांचे गेल्या २० वर्षांपासून दागिने बनविण्याचे काम करत होता. तो फिर्यादीच्या घरात १३ वर्षांपासून कुटुंबासह राहत होता. त्याने विश्वासघात करून फसवणूक केल्याने अखेर कादर यांनी सिटी चौक ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून गुरुवारी (दि. २६) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महामार्गावर चाकूहल्ला; ट्रकचालकास लुटले

संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर-पुणे महामार्गावरील भेंडाळा फाटा परिसरात भरदुपारी अज्ञात तिघांनी ट्रकचालकावर चाकूहल्ला करून रोख रक्कम लुटल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (दि.२६) दुपारी सुमारे ३ वाजेच्या सुमारास घडली. या प्रकारामुळे महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



ट्रक क्रमांक (केए-५६-१६४८) चे चालक देवेंद्र बागी (वय ५४, रा. हुमनाबाद, जि. बिदर, कर्नाटक) हे पुण्याहून छत्रपती संभाजीनगरकडे जात होते. भेंडाळा फाटा परिसरातील एका ढाब्याजवळ त्यांनी ट्रक उभा करून विश्रांती घेतली असता, दुचाकीवरून आलेल्या तीन अज्ञात चोरट्यांनी ट्रकच्या केबिनमध्ये प्रवेश करून त्यांच्यावर अचानक हल्ला चढविला.बागी यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता, एका चोरट्याने त्यांच्या कानावर चाकूने वार केला. यात ते गंभीर जखमी झाले. त्यानंतर चोरट्यांनी त्यांच्या खिशातील सुमारे ७ हजार रुपये रोख रक्कम लुटली व ट्रकची समोरील काच फोडून तेथून पळ काढला.जखमी अवस्थेतच देवेंद्र बागी यांनी ट्रक चालवत ढोरेगावच्या दिशेने धाव घेत मदतीसाठी आरडाओरडा केला. ढोरेगाव येथील अल्ताफ शेख, विशाल जोशी, शाहेद शेख व शौकत पटेल यांनी तातडीने धाव घेत त्यांना खासगी रुग्णालयात दाखल केले.

प्राथमिक उपचारांनंतर रुग्णवाहिका चालक अनिकेत मुळक व लकी शहा यांच्या मदतीने त्यांना गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.दरम्यान, या घटनेमुळे महामार्गावरील प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

# शिरसाटवाडी येथील काळभैरवनाथाच्या प्रसिद्ध यात्रेनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

पाथर्डी प्रतिनिधी

तालुक्यातील शिरसाटवाडी येथील प्रसिद्ध असलेली काळभैरवनाथाच्या यात्रेनिमित्त मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या यात्रा उत्सवाची सुरुवात एक एप्रिल पासून होणार आहे तीन दिवस होणाऱ्या या यात्रा उत्सवाला पैठण येथून कावडीचे पाणी आणून हनुमंतराया व काळभैरवनाथ या देवतांच्या श्री च्या मूर्तींचा अभिषेक व महाआरती करण्यात येणार आहे त्याचबरोबर छबिना मिरवणूक हजेऱ्या व महाराष्ट्रातील नामवंत मल्लांच्या जंगी कुस्त्यांचा हगामा होणार असून त्याचबरोबर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध असलेली नटखट सुंदरा हा सदाबहार गाण्यांचा आर्केस्ट्रा होणार आहे या काळभैरवनाथाच्या यात्रेला संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सुभेदार गोरक्ष शिरसाट यांनी यात्रा कमिटीच्या वतीने केले आहे.



# उस्वद रोडवरील वेश्या अड्डा उद्ध्वस्त

**मंठा । प्रतिनिधी**

मंठा शहरातील उस्वद रोडवरील तुकारामनगर परिसरात मागील अनेक वर्षापासून सुरू असलेल्या वेश्या व्यवसायावर अखेर मंठा पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणी मंठा पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई २६ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ५:१५ वाजता करण्यात आली. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रयागबाई बाबुराव गुजर (रा. तुकारामनगर, उस्वदरोड, मंठा) आणि योगेश किशोर होटकर (रा. तुकारामनगर, मंठा) यांनी आर्थिक फायद्यासाठी दोन महिलांना प्रवृत्त करून त्यांच्या ताब्यातील जागेत वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे.

कारवाई दरम्यान मंठा पोलिसांनी बनावट ग्राहकामार्फत छापा टाकून आरोपींना रंगेहात पकडले. यावेळी ५०० रुपयांच्या दोन नोटा जप्त करण्यात आल्या. तसेच संबंधित ठिकाणाहून १३ निरोधही हस्तगत करण्यात आले. एकूण ११२९/ - रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

या प्रकरणात आरोपींनी पीडित महिलांचे शोषण करून त्यांच्या कमाईवर उदरनिर्वाह केल्याचेही तपासात समोर आले आहे. सदर प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माळगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.


मंठा शहरातील बहुचर्चित वेश्याव्यवसायावर अखेर कारवाई; - तत्कालीन पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांच्या काळातही या ठिकाणी वेश्याव्यवसाय सुरू होता. परंतु त्यांच्या हप्तेखोर वृत्तीमुळे या गैरप्रकाराला लगाम लागला नाही, याविषयी गजानन माळकर यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. त्या अनुषंगाने मंठा पोलिसांनी ही कारवाई केली असून या भागात संत तुकाराम महाराज मंदिर, आराध्य दैवत श्री रेणुका मातेचे मंदिर, शनिमहाराज मंदिर, महादेव मंदिर असून अशा पवित्र ठिकाणी गैरप्रकार होणार नाही याची पोलिसांनी खबरदारी घ्यावी.पं. दिनेश जोशी मंठा)

# बोंबला! पोलिसांनीच घातला ६० लाखांचा गंडा

नांदेड । प्रतिनिधी

कायद्याचे रक्षण करणाऱ्यांकडूनच कायद्याची पायमल्ली केली जात असल्याने सर्वसामान्यांनी न्याय कुणाकडे मागायचा, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्याचे कारणही तसेच आहे. चक्क दोन पोलिस कर्मचाऱ्यांनी अन्य दोघांना सोबत घेऊन एका शासकीय कर्मचाऱ्याला ६० लाखांचा गंडा घातला आहे.

६० लाखांत १ कोटीचे सोने देतो, असे आमिष दाखवून हा गंडा घालण्यात आला आहे. या प्रकरणात लोहा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, यातील एक पोलिस कर्मचारी व एका व्यक्तीस अटक केली आहे तर एक पोलिस आणि आणखी एक व्यक्ती अद्याप फरार आहे. दरम्यान, पोलिसांनीच ६० लाखांना फसवल्याच्या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की, कमी पैशात दुप्पट पैसे किंवा दुप्पट सोने देण्याचे आमिष दाखवून लुटण्याचे प्रकार भामट्यांकडून आपण नित्यनियमानेच ऐकत असतो आणि तशा घटनाही घडतात. मात्र येथे चक्क दोन पोलिस कर्मचाऱ्यांनी अन्य दोन जणांना सोबत घेऊन एका शासकीय कर्मचाऱ्याला ६० लाखांचा गंडा घातला आहे. लोहा तालुक्यातील खेडकरवाडी येथील सचिन वालाजी खेडकर (२७) हे शासकीय कर्मचारी आहेत. त्यांना १७ जानेवारी २०२६ रोजी पारडी येथे मुंडे यांचे घरबांधकाम सुरू आहे, तेथे भेटून ६० लाखांत १ कोटी रुपयांचे सोने देण्याचे आमिष दाखविण्यात आले. खेडकर आमिषाला बळी पडले आणि त्यांनी ६० लाख रुपये सोबत आणले. चौघांनी मिळून खेडकरकडून ६० लाख घेतले. त्यानंतर त्याला मारहाण करून धमकी देऊन पाठवून दिले. तसेच तुला बनावट नोटांच्या प्रकरणात अडकवतो, अशी धमकी संबंधितांनी दिली होती.

फसवणूक करणारे पोलिस कर्मचारी राजेश मुंडे (सध्या कार्यरत नांदेड मुख्यालय), ओमकार विश्वनाथ भुरे, समीर साबेरखान पठाण (सध्या कार्यरत लिंबगाव पोलिस ठाणे) व अन्य ३० ते ३५ वयाचा व्यक्ती हे चौघेही पोलिस वेशात होते.

या प्रकरणात सचिन खेडकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून लोहा पोलिस ठाण्यात २३ जानेवारी २०२७ रोजी वरील पोलिस कर्मचारी राजेश मुंडे, समीर पठाण, ओमकार भुरे अन्य एक अशा चौघांविरोधात ६० लाखांच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर चौघेही फरार झाले होते. दरम्यान, २९ जानेवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक महेश कोरे यांनी ओमकार भुरे याला अटक केली. भुरे याने पोलिस कर्मचारी राजेश मुंडे व इतर जणांनी खेडकरकडून ६० लाख रुपये घेतल्याची कबुली दिली. या प्रकरणातील आरोपी असलेल्या पोलिस कर्मचारी समीर पठाण याला पोलिसांनी गुरुवारी अटक केली आहे. पोलिस कर्मचारी राजेश मुंडे व अन्य अनोळखी आरोपी अद्याप फरार आहेत. पोलिस आणखी मुंडे व अन्य एका आरोपीचा शोध घेत असून, चार जणांनी ६० लाखांच्या बदल्यात एक कोटींचे कुठले सोने देणार होते की इतर काही कारण आहे, याचा शोध घेत आहेत. यातील पोलिसांनी सचिन खेडकर यांची फसवणूक का केली, त्या मागची कारणे शोधण्याचा प्रयत्न पोलिस करत असून, लवकरच याचा उलगडा होईल असे पोलिसांचे म्हणणे आहे.

# नळदुर्ग भुईकोट किल्ल्यासाठी सव्वा सात कोटी

धाराशिव । प्रतिनिधी

राज्यातील सर्वात मोठा भुईकोट किल्ला अशी ख्याती असलेल्या आणि मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या नळदुर्ग किल्ल्याच्या जतन आणि संवर्धनासाठी राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'नळदुर्ग किल्ला संवर्धन आणि स्थळ व्यवस्थापन आराखडा' या आराखड्यानंतर्गत पहिल्या टप्प्यातील कामांसाठी तब्बल ७ कोटी १८ लाख ९१ हजार ७९१ रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे.

कामाची निविदा प्रक्रियाही नुकतीच सुरू झाली आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्याच्या पर्यटन व्यवसायाचा मानबिंदू असलेल्या ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्याचे रूप आता पालटणार असल्याचा विश्वास आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालयामार्फत हे काम पूर्ण केले जाणार आहे. या प्रकल्पामुळे दुर्लक्षित राहिलेल्या नळदुर्ग किल्ल्याला पुन्हा एकदा गतवैभव लाभणार आहे. नळदुर्ग किल्ल्याच्या या पहिल्या टप्प्यातील कामात अनेक महत्त्वाच्या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. यात प्रामुख्याने तटबंदीचे संवर्धन हाती घेण्यात येणार आहे.



किल्ल्याची ऐतिहासिक तटबंदी अनेक ठिकाणी कमकुवत झाली आहे, त्याचे शास्त्रोक्त पद्धतीने संवर्धन केले जाणार आहे. किल्ल्यातील झुडपे आणि राडारोडाही हटविण्यात येणार आहे. किल्ल्याच्या परिसरात आणि तटबंदीवर वाढलेली अनावश्यक झुडपे तसेच साचलेला राडारोडा पूर्णपणे साफ करण्यावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. देशभरातून तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येणारे लाखो भाविक आवर्जून या भुईकोट किल्ल्याला भेट देतात.

आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्यातून शिर्डीला दर्शनासाठी जाणारे भाविक आणि पर्यटकही अलीकडच्या काळात मोठ्या संख्येने किल्ला पाहण्यासाठी येत आहेत. पर्यटकांच्या सोयीसाठी आणि किल्ल्याचे सौंदर्य वाढवण्यासाठी स्थळ व्यवस्थापन आराखड्याची अंमलबजावणी पहिल्या टप्प्यात हाती घेण्यात आली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.पुरातत्व विभागाच्या नियमांनुसार आणि तज्ज्ञ वास्तुविशारदांच्या मार्गदर्शनाखाली हे काम पूर्ण करण्याचे कंत्राटदाराला बंधनकारक असणार आहे. दीड वर्षाच्या आत पर्यटकांना नळदर्ग किल्ल्याचे पालटलेले रूप पाहायला मिळणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे. या संवर्धन प्रकल्पामुळे नळदुर्ग किल्ला पर्यटनाच्या नकाशावर अधिक ठळकपणे येईल आणि स्थानिक पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# माजलगावात रामभक्तांवर गुन्हे दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील झालेल्या राम जयंती मधे आवाजाची मर्यादा वाढवल्याचे कारण देत प्रभू श्रीराम जयंती उत्सव समिती आयोजकांवर माजलगाव शहर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

माजलगाव शहरात दि २६ मार्च गुरुवार रोजी सायंकाळी प्रभू श्रीराम च्या जयंती निमित्त मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते झेंडा चौकापासून सुरू झालेली जयंती रात्री मर्यादित वेळेच्या आत आयोजकांनी थांबवली परंतु हनुमान चौकात आवाजाची मर्यादा वाढवल्याचे कारण देत माजलगाव पोलिसांनी श्रीराम जयंती आयोजकांवर बी एन एस २२३ अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांच्या या भूमिकेमुळे माजलगावातील




हिंदू संघटनांमध्ये पोलिसांप्रती तीव्र रोष आहे.

संपूर्ण जिल्ह्यात डी. जे वाजले माजलगावातच पोलिसांना काय अडचण?

रामनवमीनिमित्त संपूर्ण भारतात राम भक्तांचा उत्साह द्विगुणीत झाला होता ठीक ठिकाणी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली बीड जिल्ह्यातही बीड,परळी,धारूर, अंबाजोगाई, वडवणी येथे डीजे वाजले परंतु त्या ठिकाणच्या पोलिसांनी सामंजस्याची भूमिका घेत राम भक्तांना सहकार्य केले परंतु कर्तव्यदक्ष माजलगाव पोलिसांना मात्र रामाच्या गाण्याचा थोडाही आवाज सहन झाला नाही.दुपार पासून माजलगाव पोलीस राम भक्तांच्या मागे लागले होते.नवा मोंढा समोर त्यांनी जयंती साठी आलेला डी.जे. अडवला तब्बल दोन तास त्यांनी राम भक्तांची परीक्षा पहिली. यावेळी माजलगावातील अनेक जैष्ट मंडळींनी पोलिसांना विनंती केली तेंव्हा पोलिसांनी डी.जे सोडला परंतु शेवटी दुसऱ्या दिवशी जयंती आयोजकांवर गुन्हे दाखल करून पोलिसांचा आत्मा शांत झाला.

आमदारांची विधानसभेत पी.आय. च्या कारभारा विरुद्ध तक्रार.

माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी दोन दिवसापूर्वीच विधानसभेत माजलगावचे पीआय सूर्यतळ यांच्या विरोधात प्रश्न विचारला होता.माजलगावात गेल्या वर्षभरापासून चोरी, घरफोडी, दारू,गुटक्याचा सुळसुळाट व अवैध धंदे वाढल्याची तक्रार आ. प्रकाश सोळंके यांनी दिली यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी चौकशी करण्याचे आश्वासन दिले. माजलगावात अवैध धंदेवाल्यांना पाठबळ व राम भक्तांवर गुन्हे दाखल झाल्याने माजलगाव पोलिसांप्रती हिंदू समाजात तीव्र नाराजी आहे.लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे स्थानिक पी आय च्या कारभाराची तक्रार करणार असल्याचे माजलगावातील भाजप नेत्यांनी स्पष्ट केले आहे.

# तिसऱ्या मजल्यावरून उडी घेत महिलेची आत्महत्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात आज दि.२८ मार्च शनिवार रोजी सकाळी धक्कादायक घटना घडली शहरातील पठाण मांडवा रस्त्या लगतच्या परिसरात एका अज्ञात महिलेने तिसऱ्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेत संबंधित महिलेचा जागीच मृत्यू झाला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास ही घटना घडली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. स्थानिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर अंबाजोगाई शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.



दरम्यान, मृत महिलेची ओळख पटली असून वैशाली सुनिल चिकटकर असं सदरिल महिलेचे नाव आहे. मूळच्या जवळगाव येथील रहिवासी असलेल्या वैशाली मुलांच्या शिक्षणासाठी अंबाजोगाईत भाड्याने रहात होत्या. त्यांनी आत्महत्या का केली ? याचे कारणही अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलीस विविध अंगांनी तपास करत आहेत. या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त केली जात असून, अधिक तपास अंबाजोगाई शहर पोलीस करत आहेत.

# सामाजिक सलोखा जपण्यासाठी ईद-ए-मिलाप कार्यक्रमास उपस्थित रहा- शेख निजाम

बीड । प्रतिनिधी

मुस्लिम धर्मीयांचा सर्वात मोठा सण ईद-उल-फितर असल्याने पवित्र रमजानचे उपवास धरून रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करतात सदरील महिन्यामध्ये सर्व धर्मीय आपापल्या परीने सदरील महिन्यामध्ये एकत्रित येत असतात पवित्र रमजान महिन्याच्या उपवासानंतर येणाऱ्या ईद मध्ये सर्व धर्मीय बांधव मुस्लिम समाजाच्या आपल्या बांधवांना शुभेच्छा देतात व शिरखुर्मा याचा आस्वाद घेत असतात भारताच्या या गंगाजमुनी तहजीब मुळे भारत हा विविधते तून एकता हा संदेश जगाला पोहोचवत असतो हाच धागा पकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व शिवछत्र परिवाराच्या वतीने दिनांक २९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी पाच ते नऊ या वेळेमध्ये अकबर कॅपिटल जुनी अशोक टॉकीज बशीर गंज बीड या ठिकाणी ईद-ए-मिलाप या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून सदर कार्यक्रमांमध्ये आमदार विजयसिंह पंडित यांचे प्रमुख उपस्थिती राहणार असून सदरील कार्यक्रमांमध्ये बीड जिल्हाध्यक्ष अँड राजेश्वर चव्हाण, शहराच्या प्रथम नागरिक नगराध्यक्ष प्रेमलता ताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद जी मुळक, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, महिला जिल्हाध्यक्ष प्रज्ञाताई खोसरे, गटनेते फारुख पटेल, बीड नगर परिषदेचे सभापती अमर नाईकवाडे, सभापती संजय उडान, सभापती बाळासाहेब गुंजाळ, सभापती जकी सौदागर , सभापती आरती बनसोडे, उपसभापती शेख बिलाल सर्व नगरसेवक व सामाजिक, राजकीय, सर्व क्षेत्रातील लोकप्रतिनिधीं आदी मान्यवर उपस्थित राहणार असून सर्व धर्मीय समाज बांधवांनी या सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणाऱ्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्यांक विभाग चे जिल्हाध्यक्ष तथा सभापती नगरपरिषद बीड शेख निजाम जैनुद्दीन यांनी केले आहे



◀◀ पान ३ वर

# ऊस बिल १४ दिवसांत द्या; अन्यथा १५% व्याज आकारा-गंगाभिषण थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

ऊस नियंत्रण आदेश १९६६ नुसार साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना किमान एफ.आर.पी.प्रमाणे ऊसाचे बिल १४ दिवसांच्या आत अदा करणे बंधनकारक असताना, बीड जिल्ह्यात अनेक कारखान्यांकडून याची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप शेतकरी नेते गंगाभिषण थावरे यांनी केला आहे. तसेच विलंब झाल्यास १५ टक्के व्याज आकारण्याची तरतूद तत्काळ लागू करावी, अशी मागणी त्यांनी साखर आयुक्तांकडे केली आहे.



थावरे यांनी साखर आयुक्तांकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आदेशातील कलम ३(३) नुसार गाळप केलेल्या उसाची रक्कम वेळेत देणे आवश्यक आहे. तसेच, कलम ३(३अ) प्रमाणे ठरलेल्या मुदतीत एफ.आर.पी. देयक न दिल्यास संबंधित कारखानदारांकडून विलंब कालावधीसाठी १५ टक्के व्याज आकारण्यात यावे.

यावर्षीच्या गाळप हंगामाला सुमारे पाच महिने उलटूनही बीड जिल्ह्यातील काही साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना उसाची पहिली उचलदेखील दिलेली नाही. ही बाब नियमबाह्य असून शेतकऱ्यांवर अन्याय करणारी असल्याचे थावरे यांनी नमूद केले. मार्च अखेरपर्यंत शेतकऱ्यांना ऊसाचे बिल न दिल्यास संबंधित कारखानदारांना नोटीस बजावण्याची मागणी त्यांनी केली आहे. अन्यथा साखर आयुक्त कार्यालयाविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, अतिवृष्टीमुळे यावर्षी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून ऊसासह इतर पिकांवरही परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने ऊसाचे बिल देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जनहित याचिका क्र. ७२/२०१९ मध्ये दिलेल्या आदेशानुसार विलंबित देयकांवर १५ टक्के व्याज आकारण्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणीही थावरे यांनी केली आहे.

# श्रीराम जन्मोत्सव व यात्रा महोत्सवाची छबिना मिरवणूक व कुस्त्यांच्या सामन्यांनी सांगता

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथे गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या श्रीराम नवमी जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सवाची छबिना मिरवणुक व कुस्ती स्पर्धेने सांगता झाली.



ग्रामदैवत प्रभु श्रीरामचंद्र महाराज यांचा जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सव गेल्या ३५० वर्षापासुन येथे अतिशय धुमधडाक्यात आणि आनंदमयी वातावरणात साजरा करण्यात येते याही वर्षी हा सोहळा तीन दिवसापासून चालु असुन आज मध्यरात्री १२ वा.प्रभु श्रीराम यांची पालखी मध्ये स्थापना करून वाजत गाजत ढोलताशांच्या व गजरात छबिना मिरवणूक निघाली होती यावेळी गावकऱ्यांनी डिजे च्या तलावर ठेका धरत छबिना मिरवणुकीत मनमुराद होऊन नाचण्याच आनंद लुटला तर पहाटे ४ वाजता छबिना मिरवणुक हनुमान मंदिरास प्रदक्षिणा घालुन विसावली यावेळी पारंपरिक भारूडाचा कार्यक्रम घेण्यात आला तर दुसऱ्या बाजुला शोभेची दारु उडवण्यात आली तर दु.३ व भव्य कुस्त्यांच्या स्पर्धेने या श्रीराम नवमी जन्मोत्सवाची व यात्रा महोत्सवाची सांगता झाली.

# दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपी अखेर जेरबंद

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षकांनी जिल्हयात दि.२१ते ३१ मार्च पर्यंत जिल्हयातील फरार आरोपी शोध मोहीम राबवुन विविध गुन्हयात फरार/पहीजे आरोपींताचा शोध घेवुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत आदेशीत केले होते. यावरुन पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी सर्व पथक प्रमुख यांना आदेश देवुन कारवाई करण्याचे आदेशीत केले होते.

दि.२७ मार्च रोजी पो. उपनि महेश विघ्ने हे त्यांचे पथकासह पाहीजे / फरार आरोपीतांचा शोध घेणेकामी केज उपविभागात रवाना झाले होते. पोलीस स्टेशन केज येथील गु.र.नं २३१/१९९१ कलम ३९५ भा.द.वि गुन्हयातील फरार आरोपी नामे भागवत कमसऱ्या पवार रा. कोरेगाव ता. केज जि.बीड याचा शोध घेत असताना पोउपनि विघ्ने यांना गोपनिय माहीती मिळाली की सदर आरोपी हा खुप दिवसानंतर कोरेगाव येथे त्याचे राहते घरी आला आहे. यावरुन स्था.गु.शा पथकाने सापळा लावुन आरोपीस ताब्यात घेतले. सदर आरोपी हा पो.स्टे केज गु.र.नं २६८/२०१८ कलम १४३,१४७,१४९ भा.द.वि गुन्हयात देखील पाहीजे होता. सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्यास पुढील कारवाई कामी पो.स्टे. केज यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कारवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत , अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम व पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे शाखा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि महेश विघ्ने, पोह/ महेश जोगदंड, पोह/दिलीप गित्ते, चापोह / गणेश मराडे यांनी केली आहे.



# तुमच्यातले सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करा- चंद्रशेखर बर्दापूरकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक संकुलात काम करताना संस्थेच्या गौरवशाली परंपरेला बाधा येणार नाही असे प्रत्येकाचे वर्तन असले पाहिजे शिवाय तुमच्या मधील चांगले जे आहे ते देण्याचा प्रयत्न करावा असे मत संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी व्यक्त केले. योगेश्वरी सैनिक स्कुल मध्ये उद्बोधन बैठकीत बोलत होते.

यावेळी प्राचार्य मेजर एस.पी.कुलकर्णी, उपप्राचार्य व्ही.व्ही. कुलकर्णी उपस्थित होते. पुढे बोलताना बर्दापूरकर यांनी संस्थेच्या शंभर वर्षांहून अधिकच्या गौरवशाली परंपरेचा इतिहास सांगितला. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली अनेक




शिक्षकांनी योगदान दिले. विद्यार्थी घडवले. संस्थेचा नावलौकिक वाढवला. तुम्ही जे कार्य कराल ते तुमच्यानंतर येणारे सर्वजण अनुसरणार आहेत असे आवाहन केले.सैनिक स्कूल असल्याने शिस्तीला अत्यंत महत्त्व असून सर्वांनी ही जबाबदारी काटेकोरपणे पाळली पाहीजे आपल्या संस्थेतील सैनिक स्कूल ही मराठवाड्यात सर्वोत्कृष्ट व्हावी यासाठी सर्वांचे प्रयत्न असावेत असे सांगून तुम्ही जे काम कराल त्या कामाच्या प्रभावावर पुढची पिढी चालणार आहे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक,शिस्तीच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करा असेही ते म्हणाले. यावेळी कुलकर्णी यांनी विद्यार्थी हाच केंद्रबिंदू मानून सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडवण्याचा सर्वांनी प्रयत्न करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.संस्थेला व शैक्षणिक संकुलास बदनामीकारक कृती आपण कधीही करणार नाही, असा संकल्प प्रत्येकाने केला पाहिजे, असेही ते म्हणाले. वृक्षारोपण हा संस्कार नसून राष्ट्राची बांधिलकी आहे,असे त्यांनी सांगितले. पर्यावरणाचा ऱ्हास थांबवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले. यावेळी अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले.तसेच वृक्षलागवडीसाठी शेंदूर या वनस्पतींच्या बियाणांचे वाटप करण्यात आले.

# मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरु

बीड । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार भारतातील ९ राज्य व ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. पुढील टप्प्यात महाराष्ट्रासह अन्य राज्यातही सदर कार्यक्रम लवकरच सुरु होणार आहे. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा.मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडुन प्राप्त निर्देशानुसार सदरच्या कार्यक्रमाची पूर्वतयारी आपल्या विभागात सुरु करण्यात आलेली आहे.

आगामी विशेष सखोल पुनरिक्षणाच्या अनुषंगाने प्रथमतः मॅपींगची कार्यवाही सेल्फ पध्दतीने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी Table Top Activity द्वारे करुन घेणार असुन यामध्ये सन २००२ ची विशेष सखोल पुनरिक्षणाची अंतिम मतदार यादी, सन २०२४ घ्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अंतिम मतदार यादीसह मॅप करुन, मॅपींगची कार्यवाही पुर्ण करणार आहे. नंतर Top -ctivity Ûmao Self पध्दतीने (जपश-ीं-जपश) प्राप्त न होणाऱ्या नोंदी संदर्भात झीसशपू चर्रीळिपस कार्यपध्दती अवलंबून मॅपींग करावयाची आहे यामध्ये सन २०२४ च्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अंतिम मतदार यादीतील ज्यांची नावे सन २००२ च्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतिम मतदार यादीमध्ये उपलब्ध नसतील, अशा मतदारांचे मॅपींग त्यांचे आई/वडील किंवा आजी/आजोबा यांची नावे सन २००२ च्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतिम मतदारयादीमध्ये शोधुन त्याप्रमाणे नोंदी घेऊन Progeny Mapping पुर्ण करणार आहे. या पध्दतीने मॅपींग केल्यानंतर, सन २०२४ च्या सार्वत्रिक निवडणूकांच्या अंतिम मतदार यादीतील शिल्लक राहिलेल्या णपार्रीशिव मतदारांचे मॅपींग करण्याच्या दृष्टीने संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हे संबंधित मतदारांच्या निवासाचा पत्यावर जाऊन ते स्वतः किंवा त्यांचे आई-वडिल / आजी-आजोबा यांचे सन २००२ च्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतिम मतदार यादीमधील माहिती जाणून घेऊन त्या माहितीच्या आधारे भारत निवडणूक आयोगाच्या मतदार सेवा पोर्टलवर (https://voters.eci.gov.in/) भेट देऊन त्याद्वारे णपार्रीशिव मतदारांचे चर्रीळिपस करणार आहे.

तसेच अस्पष्ट व मानवी नसलेल्या छायाचित्राची पडताळणी व ऊडए ( वशोसीरहिळल ीळाळश्ररी शर्पीीळशी ) च्या अनुषंगाने पडताळणी व वगळणी बाबतची कार्यवाही

◀◀ पान ३ वर

# नाथापूर येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सुरूवात

बीड । प्रतिनिधी

प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी बीड तालुक्यातील नाथापूर गावी अखंड हरिनाम सप्ताह राम नवमी पासून सुरूवात झाली असून अखंड हरिनाम सप्ताहाचे हे पंधरावे वर्षे असून कार्यक्रमाची दैनंदिनी पहाटे सकाळी काकडा, १० ते १२ वा. ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते २ भागवत कथा, ५ ते ७ वा. राम कथा, संध्याकाळी हरिपाठ आणि रात्री दररोज नऊ वाजता कीर्तनाचा कार्यक्रम होईल उद्या रविवारी २९ मार्च रोजी श्री ह. भ. प. शिवचरित्र वाणीभूषण बाळासाहेब शिंदे तर ३० मार्च सोमवार रोजी श्री रामायणाचार्य श्री हभप राजेंद्र महाराज वाघमारे गोंदीकर, ३१ मार्च मंगळवारी श्री ह भ प शब्द प्रेमी संग्राम बापू भंडारे पाटील १ एप्रिल बुधवारी श्री स्वर भास्कर श्री ह भ प ऋषिकेश महाराज नवले आणि शेवटी दोन एप्रिल गुरुवारी काल्याचे किर्तन या भागातील प्रसिद्ध भागवताचार्य श्री ह भ प रामेश्वर महाराज मते यांच्या गोड वाणीतून होणार आहे. शेवटच्या दिवशी काल्याचा प्रसाद होईल तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे नाथापूरकरांनी आवाहन केले आहे .

# श्री क्षेत्र लाटे बाभळगाव (मारुतीचे) येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## सदगुरू प.पू. मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वरचा उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

हनुमान जयंती निमित्त श्री क्षेत्र लाटे बाभळगाव (मारुतीचे) येथे अखंड हरिनाम सप्ताह रामायण पारायण सोहळ्यात सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर आयोजित मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबीर संपन्न झाले आहे.

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर तथा सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर च्या वतीने तालुक्यातील लाटे बाभळगाव येथे मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीराची सुरुवात दीपप्रज्वलन श्री स्वामी समर्थ महाराज व धन्वंतरी पूजन करून झाले. या शिबीरात नाडी परीक्षण करून वात, कफ, पित्त, सांधेदुखी, मान, पाठ, कंबर दुखणे, कर्करोग, महिलांचे विविध आजाराची मोफत तपासणी व निदान करण्यात आले. बी पी, शुगर, ईसीजी, फिजिओथेरपी इत्यादी आरोग्य सेवा मोफत देण्यात आल्या.



◀◀ पान ३ वर

## राज्य लोकतंत्र

**तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे**

अंबाजोगाई- तालुका व शहर प्रतिनिधी
शिरूर कासार- तालुका व शहर प्रतिनिधी
आष्टी- शहर प्रतिनिधी
परळी- शहर प्रतिनिधी
धारूर- शहर प्रतिनिधी
केज - शहर प्रतिनिधी

**वृत्तपत्रांमध्ये कामाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. इच्छुकांनी ५ एप्रिल २०२६ पर्यंत संपर्क साधावा.**

**कार्यालय : दैनिक राज्य लोकतंत्र**
**कॅनॉल रोड राजीव गांधी चौक जाधव यांची बिल्डिंग दुसरा मजला बीड**

आपले अर्ज ई-मेल- rajyaloktantra75gmail.com
संपर्क नंबर ९९२२६२२५२५/९४२३१७१७२८

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे जिल्हा परिषदेला ई-गव्हर्नन्समध्ये राज्यात प्रथम क्रमांक

**पुणे । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री यांच्या१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत झालेल्या मूल्य मापनात पुणे जिल्हा परिषदेला २०० पैकी १९६.२५ गुण प्राप्त करुन राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे; सेवाकर्मी कार्यक्रमामध्ये जिल्हा परिषदेची 'प्रथम' क्रमांकाने निवड झाली आहे. आज मुंबई येथील सह्याद्री सभागृहात पार पडलेल्या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



मुख्यमंत्री यांच्या१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील शासकीय कार्यालयांच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यात आले. यामध्ये सात महत्त्वाच्या घटकांवर- कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमता व ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर तसेच भौगोलिक माहिती प्रणालीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यालयांची निवड करण्यात आली.

श्री. गजानन पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून जिल्हा परिषदेने डिजिटल प्रशासनाच्या क्षेत्रात अभिनव उपक्रम राबवून नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक व जलद सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. जिल्हा परिषदेकडून खपींशसीरींशव थींज्ञी चरपरसशाशपीं ड्रींशा (खथचड), 'स्पंदन', ई-लॉटरी, ड्रींशा `ष झशपीळेप खश्रश्रीींीरींळेप (डजझख), क्यूआर कोड आधारित कर संकलनप्रणाली यांसारख्या नाविन्यपूर्ण प्रणाली विकसित करण्यात आल्या असून, यामुळे प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक झाले आहे.

पुणे जिल्हा परिषदेचे अधिकृत संकेतस्थळ हे द्विभाषिक, सुरक्षित व सुलभ असून नागरिकांना सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देते. 'आपले सरकार' प्रणालीत १०० टक्के सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ई-ऑफिस प्रणालीमुळे कागदविरहित प्रशासनाला गती मिळाली असून हजारो नस्ती जलद निकाली काढण्यात आल्या आहे. तसेच इंटिग्रेटेड स्मार्ट डॅशबोर्डद्वारे डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया सक्षम झाली आहे.

**सेवाकर्मी कार्यक्रमातही विशेष कामगिरी**

सेवाकर्मी कार्यक्रमामध्ये 'विशेष प्रशंसनीय' म्हणून निवड होणे ही जिल्हा परिषदेच्या सेवा गुणवत्ता, नागरिक समाधान, कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता आणि डिजिटल सेवा विस्ताराची पावती मानली जात आहे. १५० दिवसांच्या कार्यक्रमातील यशाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, प्रकल्प संचालक शालिनी कडू, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत खरात यांच्यासह सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमाच्या सादरीकरणात व सर्व घटकांच्या एकत्रीकरणात महत्त्वाची भूमिका बजावल्याबद्दल सामान्य प्रशासन विभाग व त्याच्या टीमचेही त्यांनी अभिनंदन केले.

# पुण्यात महिलेवर अत्याचार करणाऱ्या भोंदू ऋषीकेश वैद्यला पिंपरीतून अटक

**पिंपरी । प्रतिनिधी**

दैवी शक्तीचा संचार असल्याची बतावणी करून महिलेवर अत्याचार करुन पसार झालेला भोंदू ऋषीकेश वैद्य याला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने पिंपरीतून अटक केली. याबाबत एका ३५ वर्षीय महिलेने फिर्याद दिली होती. पीडित महिला मूळची पुण्यातील आहे.



ऑक्टोबर २०२३ मध्ये महिलेची भोंदू ऋषीकेश वैद्य याच्याशी समाज माध्यमातून ओळख झाली. आरोपी मूळचा वसईचा आहे. पीडित महिला व्रतवैकल्ये करायची. भोंदूने तिला जाळ्यात ओढले.

'माझ्यात दैवी संचार आहे. ईश्वराची उपासना कशी करायची, याचे तंत्र तुला शिकवितो,' अशी बतावणी त्याने महिलेकडे केली. त्यानंतर त्याने महिलेला जाळ्यात ओढले. आरोपी २०२३ मध्ये पुण्यात आला. त्याने पीडित महिलेची मांजरी परिसरात भेट घेतली. त्यानंतर गुंगीचे औषध देऊन तिच्यावर बलात्कार केला. आरोपीने तिला पुन्हा वसईत बोलावले. वसईतही तिच्यावर बलात्कार केला. नाशिकमधील भोंदू अशोक खरात याने महिलांना जाळ्यात ओढून बलात्कार केल्याची घटना उघडकीस आल्यानंतर पुण्यातील पीडित महिलेने पोलिसांकडे धाव घेऊन तक्रार दिली. तिच्यावर गुदरलेल्या प्रसंगाची माहिती तिने पोलिसांनी दिली. सुरुवातीला तिने वसईतील माणिकपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. वसई पोलिसांनी संबंधित गुन्हा तपासासाठी पुण्यातील हडपसर भागात मांजरी पोलीस ठाण्यात वर्ग केला.

वैद्य याचा पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेची चार पथकांकडून शोध घेण्यात येत होता. वैद्य हा पिंपरी परिसरात असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्यानंतर गुन्हे शाखेच्या युनिट सहाच्या पथकाने त्याला अटक केली, अशी माहिती गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे यांनी दिली. 'वैद्य याने आणखी काही महिलांवर अत्याचार केल्याची शक्यता आहे. दैवी शक्तीचा संचार झाल्याची बतावणी करून त्याने महिलेवर अत्याचार केले. अशा प्रकारची कुणाची तक्रार असल्यास पीडित महिलांनी पुणे पोलिसांकडे तक्रार द्यावी,' असे आवाहन त्यांनी केले आहे.

# पुण्यात पोलीस भरतीच्या परीक्षेत धावताना तरुणाचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात भरती होऊन देशसेवा करण्याचे स्वप्न उराशी बाळगून आलेल्या एका तरुण उमेदवाराचा मैदानी चाचणीदरम्यान मृत्यू (झींपश झेश्रळलश इहरींळ) झाल्याची हृदयद्रावक घटना पुण्यात (झींपश झेश्रळलश इहरींळ) घडली आहे. शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालय मैदानावर शनिवारी सकाळी ही दुर्घटना घडली. पुरुषोत्तम बारकुल (वय २३, रा. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) असे या मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे पोलीस भरती प्रक्रियेला गालबोट लागले असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



पुणे शहर पोलीस दलाची भरती प्रक्रिया गेल्या महिनाभरापासून शिवाजीनगर पोलीस मुख्यालयाच्या (झींपश झेश्रळलश इहरींळ) मैदानावर सुरू आहे. शनिवारी सकाळी नेहमीप्रमाणे मैदानी चाचणीला सुरुवात झाली. पुरुषोत्तम बारकुल यानेही या प्रक्रियेत (झींपश झेश्रळलश इहरींळ) सहभाग घेतला होता. पोलीस भरतीमध्ये १६०० मीटर धावण्याची चाचणी ही अत्यंत कठीण आणि शारीरिक क्षमतेचा कस पाहणारी मानली जाते. पुरुषोत्तमने आत्मविश्वासाने धावण्यास सुरुवात केली होती.

त्याने मैदानावर दोन फेऱ्या यशस्वीपणे पूर्ण केल्या. मात्र, तिसऱ्या फेरीत धावत असताना अचानक त्याला अपस्माराचा (फिट) तीव्र झटका आला. यामुळे तो धावतानाच मैदानावर बेशुद्ध होऊन कोसळला. त्याच्यासोबत धावणाऱ्या इतर उमेदवारांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा केला. मैदानावर उपस्थित असलेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने पुरुषोत्तमकडे धाव घेतली. तेथे तैनात असलेल्या वैद्यकीय पथकाने त्याची प्राथमिक तपासणी (झींपश झेश्रळलश इहरींळ) केली असता, त्याच्या हृदयाचे ठोके (झींपश झेश्रळलश इहरींळ) अत्यंत मंद झाल्याचे निदर्शनास आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्याला तातडीने पोलीस वाहनातून ससून रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्याची प्राणज्योत मालवली होती. ससूनमधील वैद्यकीय तज्ज्ञांनी त्याला 'मृत घोषित' केले. पुरुषोत्तम हा मूळचा बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा येथील रहिवासी होता. अत्यंत सामान्य परिस्थितीतून पुढे येत, त्याने पोलीस होण्यासाठी जिद्दीने (झींपश झेश्रळलश इहरींळ) तयारी केली होती. पहाटे उठून सराव करणे आणि मैदानी चाचणीसाठी स्वतःला झोकून देणे, हे त्याचे रोजचे काम होते. मात्र, ज्या खाकी वर्दीचे स्वप्न त्याने पाहिले होते, ती वर्दी मिळवण्यापूर्वीच काळाने त्याच्यावर घाला घातला.

# वडगाव शहराला दिलासा! ३९.३३ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेतील दोन जलशुद्धीकरण केंद्रांचे लोकार्पण

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत ३९ कोटी ३३ लाख रुपयांचा निधी मंजूर करून वडगाव शहरासाठी राबविण्यात आलेल्या वाढीव पाणीपुरवठा योजनेतील शिंदेटेकडी (२ चडऊ) आणि संस्कृती (२ चडऊ) या दोन महत्त्वपूर्ण जलशुद्धीकरण केंद्रांचे लोकार्पण शुक्रवार (२७ मार्च २०२६) रोजी उत्साहात पार पडले. माळीनगर येथील शिंदेटेकडी जलशुद्धीकरण केंद्र परिसरात आयोजित कार्यक्रमात आमदार सुनील आण्णा शेळके यांच्या हस्ते या प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले.





या सोहळयास माजी उपसभापती गणेश अप्पा ढोरे, माजी सरपंच बाळासाहेब ढोरे, माजी महिला सरपंच नंदाताई ढोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नगराध्यक्षा अबोली मयूर ढोरे, उपनगराध्यक्ष तथा पाणीपुरवठा व जलनिस्सारण सभापती सुनील गणेश ढोरे, नगरसेवक पंढरीनाथ ढोरे, अजय म्हाळसकर, गणेश म्हाळसकर, अजय भवार, विरोधी पक्षनेत्या अर्चना म्हाळसकर, अनंता कुडे, विशाल वहिले, पुनम भोसले, माया चव्हाण, वैशाली सोनवणे, सुनिता ढोरे, राणी म्हाळसकर, रूपाली ढोरे, आकांक्षा वाघवले, संदिप म्हाळसकर, रोहित धडवले यांच्यासह नगरपंचायतीचे पदाधिकारी, अधिकारी, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार सुनील आण्णा शेळके यांनी शिंदेटेकडी जलशुद्धीकरण प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल म्हाळसकर कुटुंबियांचे विशेष आभार मानले. तसेच प्रकल्पाचे काम ठेकेदार ईगल इन्फ्रा, मुख्याधिकारी डॉ. प्रविण निकम आणि वडगाव नगरपंचायत प्रशासनाने उत्कृष्ट दर्जाने व नियोजित वेळेत पूर्ण केल्याबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी सर्वांचे कौतुक केले. नगराध्यक्षा अबोली मयूर ढोरे यांनी आपल्या मनोगतात पाणीपुरवठा योजनेसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार शेळके यांचे आभार मानले. तसेच वडगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यातही मोठ्या प्रमाणात निधी मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरोग्य सभापती सौ. माया अमर चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी पाणीपुरवठा व जलनिस्सारण सभापती श्री. सुनील गणेश ढोरे यांनी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी व नागरिकांचे आभार मानले. दरम्यान, शिंदेटेकडी व संस्कृती या दोन्ही जलशुद्धीकरण प्रकल्पांमुळे वडगाव शहरातील नागरिकांना शुद्ध, स्वच्छ आणि मुबलक पाणीपुरवठा उपलब्ध होणार असून, शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# २५ हून अधिक गुन्हे असलेला घरफोडी बहाद्दर गजाआड; ५ लाखांचे सोने जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

मार्केटयार्ड आणि बिबवेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल असलेल्या घरफोडी प्रकरणांचा छडा लावत गुन्हे शाखा युनिट-२ ने सराईत गुन्हेगाराला अटक केली आहे. अर्जुनसिंग रजपुतसिंग दुधानी (४८, रा. बहात्तर वस्ती, मांजरी, ता. हवेली) असे आरोपीचे नाव आहे.




रामनवमीच्या पार्श्वभूमीवर बंदोबस्तावर असताना गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाला माहिती मिळाली की, घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार बैल बाजार मार्केटयार्ड परिसरातून जाणार आहे. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने मार्केटयार्ड तसेच बिबवेवाडी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दोन घरफोडीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून सुमारे ५ लाख ४० हजार रुपये किमतीचे ४५ ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा रेकॉर्डवरील अट्टल गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी २५ पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. अटकेनंतर त्याला पुढील कारवाईसाठी मार्केटयार्ड पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) निखील पिंगळे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे-१) शैलेश संखे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित जाधव यांच्या सूचनांनुसार करण्यात आली. या पथकात सहायक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ तसेच पोलीस अंमलदार संजय जाधव, उज्वल मोकाशी, संतोष टकले, विनोद चव्हाण, ओंकार कुंभार, योगेश मांढरे, शंकर कुंभार, विजयकुमार पवार, विशाल दळवी, शंकर नेवसे आणि ऋषिकेश व्यवहारे यांनी सहभाग घेतला.

# पुणे गाडीखाना दवाखान्यासाठी ९७.९६ लाखांच्या कामांना मंजुरी

**पुणे । प्रतिनिधी**

कसबा मतदारसंघातील गाडीखाना दवाखान्यात विविध विकासकामे करण्यासाठी सुमारे ९७.९६ लाख रुपयांच्या निविदेला महापालिकेच्या स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. याबाबतची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. या कामाचा प्रस्ताव महापालिकेच्या भवन विभागामार्फत सादर करण्यात आला होता. संबंधित कामासाठी सर्वांत कमी दर देणाऱ्या ठेकेदाराची निवड करण्यात आली असून, त्यांच्या निविदेनुसार २ टक्के कमी दरात काम करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने मांडला होता.

या प्रकल्पाच्या एकूण खर्चात जीएसटी, रॉयल्टी, तसेच मटेरिअल टेस्टिंग शुल्काचा समावेश असून, अंतिम खर्च सुमारे ९७.९६ लाख रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. मात्र, चालू आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात या कामासाठी सुमारे ९५.२० लाख रुपयांचीच तरतूद उपलब्ध आहे. त्यामुळे उपलब्ध निधीनुसार टप्प्या-टप्प्याने काम पूर्ण केले जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, या कामासाठी डिपॉझिट फंडाचा वापर न करता महापालिकेच्या नियमित अर्थसंकल्पीय तरतुदीतूनच खर्च भागविण्यात येणार आहे. स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर ठेकेदारासोबत करारनामा करून प्रत्यक्ष कामाला लवकरच सुरुवात होणार आहे. शहरातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने गाडीखाना दवाखान्यातील ही विकासकामे महत्त्वाची ठरणार आहेत. या कामांमुळे दवाखान्याची पायाभूत सुविधा सुधारून नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# गायींची वाहतूक करणाऱ्या टेम्पोचालकाला मारहाण; पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड शहरात गायींची वाहतूक करणाऱ्या टेम्पोचालकाला मारहाण करणाऱ्या पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कत्तलीसाठी गायी नेल्या जात असल्याच्या संशयावरून ही मारहाण करण्यात आली होती.




दौंड पोलिसांनी या बाबत माहिती दिली. टेम्पोचालक शाहरूख नूर शेख (रा. लोहियानगर, स्वारगेट, पुणे) हा २७ मार्च रोजी दुपारी भरतगाव (ता. दौंड) येथून नऊ गाया घेऊन चापडगाव (ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) येथे दौंड मार्गे निघाला होता. गायी विकत घेणारा एक जण व त्याचा मित्र देखील टेम्पोत होता. दरम्यान रात्री हा टेम्पो दौंड शहरातून अष्टविनायक मार्गाने न जाता वाट चुकल्याने शहरातील भाजी मंडईच्या दिशेने वळाला. तेथे पाच जणांनी टेम्पो अडविला.

टेम्पोतील गाया कत्तलीसाठी नेल्या जात असल्याच्या संशयावरून या तरूणांनी चालकाला दमदाटी केली. चालकाने गायी विकत घेऊन चापडगाव येथे सोडण्यासाठी जात असल्याचे सांगूनही तरूणांचे समाधान झाले नाही. त्यांच्यामधील वाद वाढून टेम्पोचालक व गायी विकत घेणाऱ्यांना दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. टोळक्याने खिशातील तेराशे रूपये काढून जीवे मारण्याची धमकी दिली, असे शाहरूख शेख याने दिलेल्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. फिर्यादीनुसार दौंड पोलिस ठाण्यात रुद्राक्ष लवटे, सुरेश पालवे (दोघे रा. गोपाळवाडी, ता. दौंड), सोनू थोरात (रा. भाजी मंडई, दौंड), संकेत दळवी (रा. मोरे वस्ती, लिंगाळी, ता. दौंड) व एक अनोळखी तरूण, असे एकूण पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता कलम ११८ (घातक साधनांनी इच्छापूर्वक दुखापत करणे किंवा जबर दुखापत करणे), कलम ११९ - १ (मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी इच्छापूर्वक जबर दुखापत करणे), कलम १८९ - २ (बेकायदेशीर जमाव करणे), कलम १९१ - २ (दंगा करणे) अन्वये पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पुणे-पिंपरी चिंचवडमधील मोरगावकरांचे १०वे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**पिंपरी । प्रतिनिधी**

श्री मयुरेश्वर-मोरगावकर सांस्कृतिक मंडळ, पुणे यांच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ हा कार्यक्रम मांजरी येथील अजिंक्यतारा रिसॉर्ट येथे अत्यंत उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला. शुक्रवार दिनांक २७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी आयोजित या कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत स्नेहमेळावा रंगला. कार्यक्रमाची सुरुवात प्रस्तावनेने होऊन कौटुंबिक परिचय, दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, स्पर्धा परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव तसेच उच्चपदावर नियुक्त मोरगावकरांचा विशेष सत्कार करण्यात आला.



यावेळी रोहिणी संदीप कदम (ढोले) उच्चशिक्षित नवनिर्वाचित सदस्या जिल्हा परिषद पुणे, तसेच डॉ. प्रवीण रामचंद्र गायकवाड (अधिष्ठाता, एडखउ आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय, पुणे) यांचा सत्कारमूर्ती म्हणून विशेष सन्मान करण्यात आला. प्रमुख पाहुणे डॉ. दत्ता कोइंकर (ज्येष्ठ व्याख्याते व माईंड पॉवर ट्रेनर) यांनी आपल्या प्रभावी व मार्गदर्शक व्याख्यानातून सकारात्मक विचार, व्यक्तिमत्त्व विकास व जीवनातील यशासाठी आवश्यक मानसिक ताकदीबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात वास्तव्यास असलेल्या सर्व मोरगावकर बांधवांना या कार्यक्रमास निमंत्रित करण्यात आले होते. यामध्ये शासकीय, निमशासकीय, खाजगी, आयटी, शैक्षणिक, राजकीय व क्रीडा क्षेत्रातील उच्च पदस्थ मोरगावकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बाळासाहेब तावरे उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती म्हणून माजी पोलिस महासंचालक सुरेश खोपडे तसेच पुणे मनपा उपायुक्त संदीप शंकरराव कदम (ढोले) यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन संतोष महादेव तावरे, अविनाश ढोले, महादेव आबा ढोले, दीपक ढोले आणि विजय कदम यांनी केले.

यावेळी उपस्थित मोरगावकर बांधवांना कार्यक्रमाची आठवण म्हणून 'श्री मोरया'ची प्रतिमा असलेले कॉफी मग स्नेहभेट म्हणून देण्यात आले. ही स्नेहभेट संतोष तावरे व पुणे मनपा उपायुक्त संदीप शंकरराव कदम (ढोले) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. श्री मयुरेश्वर-मोरगावकर सांस्कृतिक मंडळाची स्थापना २०१६ साली झाली असून हे स्नेहसंमेलनाचे दहावे वर्ष आहे. मंडळ स्थापनेचा उद्देश म्हणजे नोकरी, उद्योगधंदा व शिक्षणानिमित्त पुण्यात स्थायिक झालेल्या मोरगावकर बांधवांचा परस्पर परिचय व्हावा, एकमेकांना आधार मिळावा, अडचणीच्या काळात मदत व्हावी तसेच सण-समारंभ एकत्र साजरे करत आनंद उपभोगता यावा हा आहे. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने मोरगावकर बांधव उपस्थित होते. सर्वांच्या सहभागामुळे स्नेहसंमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# उरुळी कांचनमध्ये भाजप पदाधिकाऱ्यांचा राजीनाम्याचा इशारा

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

भर उन्हाळ्यात वीज, पाणी व खते मिळत नसल्यासह पक्षाकडून सार्वजनिक विकास व वैयक्तिक स्वरूपाची नागरिकांची कामे होत नसल्याने सत्ताधारी असूनही प्रशासनव्यवस्थेत काडीचे स्थान मिळत नसल्याने संतप्त झालेल्या शिंदवणे (ता. हवेली) येथील भाजप कार्यकर्त्यांसह तालुका पदाधिकारी गुरुनाथ मचाले यांनी पक्षाचा थेट राजीनामा देण्याचा इशारा जिल्हा व तालुका नेतृत्वाला दिला आहे. कडक उन्हाळ्यामुळे शेतीला पाण्याची गरज असताना पाणी मिळत नाही. मुळा-मुठा कालव्याभोवतालच्या गावांना मुबलक वीजपुरवठा होत नाही, प्रशासनाला निवेदन देऊनही सत्ताधारी पक्षाचे असूनही प्रशासन दखल घेत नाही खते, बियाणे मिळण्यासह खडकवासला पाणी वाटप नि?ोजनात शेतकऱ्यांना दाद न देणे, कालव्याला पाणी असूनही पाण्याला अटकाव करणे तसेच वीज रोहित्रे बदलण्याची मागणी करूनही महावितरणकडून दाद न देणे अशा पद्धतीची वागणूक प्रशासनाकडून मिळत आहे. सत्ताधारी भाजप पक्षामध्ये कार्यरत असूनही जनतेची कामे मार्गी लावता येत नसल्याने भाजपचे पदाधिकारी संतप्त झाले आहेत.

स्थानिक पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी रस्ते, पाणंद रस्ते, साकव व इतर विकास निधीसाठी मागणी करूनही पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून सहकार्य मिळत नसल्याने पदाधिकारी संतप्त आहेत. याउलट राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांना तालुक्याचे आमदार ज्ञानेश्वर कटके हे पूर्ण ताकद देऊन त्यांच्या पाठीमागे उभे राहत असल्याने त्यांच्या छोट्याशाही कामांना पाठबळ मिळत आहे. सत्ताधारी असूनही भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचे सहकार्य मिळत नसल्याने भाजपचे काम करून काय उपयोग? असा उद्विग्न सवाल या भाजप पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे. पदाधिकारी असून, लोकांची कामे मार्गी लागत नसल्याने कार्यकर्ते नेतृत्वावर नाराज असल्याची भावना पदाधिकारी बोलून दाखवत आहेत. विजेच्या त्रासाला शेतकरी कंटाळले असताना साधे रोहित्र बदलून देण्याच्या मागणीवर महावितरण निवेदनाला वाटाण्याच्या अक्षता दाखवत असतील, तर प्रश्न कसे सोडणार? हा मोठा प्रश्न आहे. कालव्यातील पाणी उचलण्यास पायबंद, विजेचा पुरवठा न मिळणे व जिल्हा नियोजन समितीकडून निधी मिळत नसल्याने पक्षाच्या भवितव्याच्या विचार करण्यापेक्षा राजीनामा योग्य, असा सूर या पदाधिकाऱ्यांत आहे. केंद्र व राज्यात सत्ता असल्याने भाजपचे जिल्ह्यात पदाधिकारी मात्र जोमात आहेत. हे वरिष्ठ मंडळी पक्षप्रचाराचा पूर्ण अजेंडा कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यावर लादत आहेत. ममन की बातफ, सभासद नोंदणी, बूथ बैठक तसेच विविध कार्यक्रम या पदाधिकाऱ्यांकडून करवून घेतले जात आहेत. मात्र, गावात काम करण्याची पदाधिकाऱ्यांवर वेळ आली तर काम हे वरिष्ठ मार्गी लावत नाही. चमकोगिरी करणाऱ्यांना प्राधान्य; मात्र सामान्य पाठीमागे, अशा पध्दतीने भाजपात भीक नको; पण कुत्रं आवर अशी अवस्था असल्याचे पदाधिकारी बोलत आहेत.